बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.१४ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# राज्यावर ‘डेटा हॅक’ होण्याचे संकट

## सतर्क:‘ऑपरेशन सिंदूर’चे फोटो, व्हीडीओ डाऊनलोड करणे महागात पडणार

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:भारत-पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या संघर्षात दोन्ही देशांनी शस्त्रसंधी स्वीकारली असली तरी पाकिस्तानच्या ‘नापाक’ इराद्यांबद्दल सांगता येत नाही. सध्या भारत-पाकिस्तान मधल्या संघर्षाची स्थिती काय आहे? ‘ऑपरेशन सिंदूर’ काय आहे? हे जाणून घेण्यासाठी भारतातील नेटिझन्स हल्लयांचे फोटो, व्हीडीओ, डाऊनलोड करून बघत असून सोशल मीडियावर डान्स ऑफ द हिलरी आणि ऑपरेशन सिंदूर इनसाइट्स. पीडीएफ अशा काही पेलोड्सदेखील शेअर झाल्या असल्याने राज्यातील यूजर्सचा डेटा हॅक होण्याचे संकट आहे. अशावेळेस नेटकरींनी सतर्क राहणे गरजेचे आहे.

तज्ज्ञांच्या मते पेलोड्स उघडल्या तर तुमच्या मोबाइल किंवा लॅपटॉप्समधील डेटा हॅक होऊ शकतो. या माध्यमातून पाकिस्तान भारताविरुद्ध सायबर युद्ध छेडण्याचा प्रयत्न करू शकतो, असा इशारा सायबरतज्ज्ञांकडून देण्यात आला आहे. आता सर्व भारतीयांना ‘ऑपरेशन सिंदूर’ काय आहे, हे जाणून घेण्याची इच्छा आहे. लोक व्हीडीओ किंवा फोटो डाऊनलोड करून बघत आहेत. सोशल मीडियावर काही पेलोड्स शेअर केल्याच्या बातम्या आहेत. जर तुम्ही हे पेलोड्स उघडले तर तुमच्या मोबाइल किंवा लॅपटॉप्समधील डेटा हॅक होऊ शकतो. यासाठी अनोळखी लोकांकडून आलेले पीडीएफ, फोटो किंवा व्हीडीओ ओपन करू नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा एखाद्या सेलिब्रिटीजचे डीपफ `क व्हीडीओ तयार केले जाऊ शकतात. त्यामुळे अशा व्हीडीओंना बळी पडू नका असे आवाहन डॉ. रोहन न्यायाधीश यांनी केले आहे.



### पेलोड कसा पसरतो?

पेलोड कायदेशीर फायलींच्या नावाखाली प्रसारित केला जात असल्याचे वृत्त आहे, विशेषत: व्हिडीओ किंवा कागदपत्रे. या फायली वारंवार एक्सटेंशनसह येतात आणि पहिल्या दृष्टिक्षेपात निरुपद्रवी दिसतात. एकदा क्लिक केल्यानंतर, ते डिव्हाइसवर कोड स्थापित करू शकतात, ज्यामुळे रिमोट ॲक्सेस आणि डेटा चोरी होऊ शकतो.

### सुरक्षिततेचे उपाय

सेटिंग्ज- स्टोरेज- मीडिया ऑटो डाऊनलोड; ऑटो मीडिया डाऊनलोड बंद करावे.मजबूत पासवर्ड वापरावे.मल्टी फॅक्टर सत्यापन चालू करावे. संशयास्पद लिंक्सवर क्लिक करू नये.तुमच्या महत्त्वाच्या फाइल्सचा बॅकअप घ्यावे.केवळ अधिकृत आणि परवानाकृत सॉफ्टवेअर वापरावे.

### पेलोड काय करू शकते ?

बँकिंग क्रेडेन्शियल्स आणि पासवर्डसह संवेदनशील वैयक्तिक डेटा काढणे. सिस्टम फाइल्समध्ये अनधिकृत प्रवेश मिळवणे. संक्रमित डिव्हाइसेसचे रिमोट कंट्रोल सक्षम करणे.


# आंतरजातीय विवाह केल्यास संरक्षण

## धोरण:जोडप्याची सुरक्षा पोलिस आयुक्त करणार

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांची सुरक्षा आता स्वत: पोलिस आयुक्त करणार आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांचे अनुदान बंद केल्याची चर्चा सुरू असताना सुरक्षेचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांसाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला.

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांना सुरक्षा देण्यासंदर्भात विशेष कक्ष गठीत करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य कक्ष गठीत करण्यात आला. या कक्षाचे प्रमुख पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक राहतील. सोबत जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी आणि महिला बालविकास विभागाचे अधिकारी सदस्य असतील. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अशा जोडप्यांच्या सुरक्षेचा आढावा दर तीन महिन्यांनी घेणार आहेत.आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांना सुरक्षेची गरज असेल तर त्यांना तात्काळ » पान २ वर



### ११२ नंबरची हेल्पलाईन

जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न असेल तर एफआयआर नोंदवून तात्काळ सुरक्षा पुरवली जावी.जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरीय ११२ नंबरची हेल्पलाइन असणार आहे. या कक्षाच्या संदर्भात दर ३ महिन्यांनी जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यासंदर्भात आढावा घेऊन अहवाल तयार करतील.

# नववधूचं प्रियकरा सोबत रफूऽऽचक्कर ऽऽ

## बोंबला:संधी साधून ठोकली धूम

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:बापाने भरपूर खर्च करून मुलीचे लग्न लावून दिले. दिल्या घरी ती सुखाने संसार करील अशी आस धरली मात्र लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी नवरी प्रियकरा सोबत पळून गेल्याची धक्कादायक घटना घडल्याने खळबळ माजली आहे. ही घटना केज तालुक्यात घडली आहे. ९ मे रोजी केज तालुक्यातील एका मंगल कार्यालयात झालेल्या या विवाह सोहळ्यात तालुक्यातील अनेक मान्यवर नेत्यांनीही हजेरी लावली होती व नव दाम्पत्याला शुभाशीर्वादही दिले होते, मात्र त्यानंतर नवरीने केलेल्या प्रतापाने सर्वांनाच धक्का बसला आहे

शुक्रवारी दुपारी केज तालुक्यातील एका खेड्यातील नववधूचे शुभमंगल झाले. लग्न लागल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नवदाम्पत्यांनी जोडीने देवदर्शनही केले. त्यानंतर रविवारी तिला मुराळी पाठवून येती-जातीसाठी माहेरी नेण्यात आले. मात्र, त्याच » पान २ वर

# महाराष्ट्रात बॉम्बस्फोटची धमकी

## सतर्क:पोलिस कंट्रोल रुमला ई-मेल शोधमोहीम सुरू



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:पुढच्या दोन दिवसांत बॉम्बस्फोट होईल, असा धमकीचा ईमेल महाराष्ट्र पोलिस नियंत्रण कक्षाला मिळाला आहे. या धमकीच्या ईमेलनंतर मुंबईसह अनेक शहरांमध्ये पोलिसांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रशासनाने या धमकीला गांभीर्याने घेण्याचा इशारा दिला आहे. » पान २ वर

# शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

## अवकाळी फटका: सरकार त्यांच्या पाठीशी उभे

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:: शेतक-यांना कुठेही वा-यावर सोडणार नाही. सरकार शेतक-यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानी संदर्भात सर्व जिल्हाधिका-यांना सूचना केल्या असल्याची माहिती खुद्द शिंदे यांनी दिली आहे.

राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतक-यांच्या नुकसानावर भाष्य करत शेतक-यांना वा-यावर सोडले जाणार नाही, असे आश्वासन दिले आहे. तसेच आम्ही निवडणुकीत जे वचननामा दिला, त्यानुसार टप्प्याटप्प्याने पुढे जात आहोत. लाडकी बहीण योजनेसह विकासकामे आपण करत आहोत, असे शिंदे म्हणाले. पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही. आम्ही जे बोलतो, ते करतो. सरकारची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. सगळ्या योजना सुरू ठेवत » पान २ वर

### बोगस बियाण्यांवर कारवाई : मंत्री शिरसाट

मंत्री संजय शिरसाट यांनी बोगस बियाण्यांवर धाडी टाकून कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले असून बोगस बी-बियाणे शहरात येते. त्यावर धाडसत्र दाखवले जाते. मात्र, अपेक्षित म्हणावी तशी कारवाई होत नाही. जे पेरतात त्यांचे होणारे नुकसान होते. त्याची वसुली झाली पाहिजे, असा नियम आहे. त्याचे पालन होत नाही. तसेच, बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई झालेली दिसत नाही. त्यासंदर्भात प्रशासनाला सक्त सूचना दिल्या. स्कॉड निर्माण करून धाडी टाकण्यास सुरवात करण्याचे सांगितले आहे असे संजय शिरसाट म्हणाले.

# आता पशुसंवर्धनमध्ये समुपदेशनाने बदल्या

## दिलासा:पंकजा मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला आहे.

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत. पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यामुळे एकत्रित पशुसंवर्धन विभागांतर्गत रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तीन हजार पेक्षा जास्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून नजिकच्या काळात सदर पदे भरली जाणे अभिप्रेत आहे.



पशुसंवर्धन विभागातील मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा, यासाठी पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील प्राधान्याने भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहेत. या पदांवर बदलीने पदस्थापना करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यासाठी समुपदेशनाची कार्यपध्दती अवलंबण्यात येणार आहे. त्याव्दारे बदलीपात्र अधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम व जेष्ठतेनुसार उपलब्ध पदांमधून त्यांच्या पसंतीचे ठिकाण निवडण्याची संधी उपलब्ध » पान २ वर

# साई संस्थान तिजोरीत पाचशे किलो सोने

## अध्यात्मिक:संस्थान प्रशासनाकडून माहिती जारी

पुण्यभूमी प्रतिनिधी

शिर्डी:शिर्डीच्या साईबाबांच्या भक्तांची संख्या लाखोंमध्ये आहे. साई चरणी भक्तांकडून नेहमीच दान-धर्म केला जातो. आता याच दानामुळे साई संस्थानच्या तिजोरीत सुमारे ५०० किलो सोने जमा झाले असून यात आणखी वाढ होत आहे. त्यामुळे आता सोने कुठे ठेवायचे असा प्रश्न उपस्थित होतो.

साई संस्थानच्या तिजोरीत पाचशे किलो सोने जमा झाले आहे. यात दागिने स्वरूपातील सोने अधिक आहे. सोन्याच्या भावात गेल्या काही वर्षात दुपटीने वाढ झाली आहे, त्यामुळे साई संस्थानच्या संपत्तीत तब्बल अडीचशे कोटी रुपयांची वाढ झाली आहे. आता साई संस्थानकडे हे सोने साठवायला जागा कमी पडत आहे. स्टेट बँककडे सोने ठेवायला दिले, तर त्यावर अडीच टक्के व्याज मिळू शकते. परंतु ही बाब न्यायप्रविष्ट झाल्याने यावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे आता ही परिस्थिती जर अशीच राहिली तर साई संस्थानला देणगी स्वरूपात येणारे सोने साठवण्यासाठी विस्तारीत जागा तयार करावी लागेल.

या पाचशे किलो सोन्याच्या साठ्यात शंभर किलो वजनाचे साई सिंहासन समाविष्ट आहे. याशिवाय, सुबक आणि मौल्यवान दागिन्यांचाही समावेश असून हे दागिने सुरक्षित ठेवावेत, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. सुमारे अडीचशे किलो सोने



वितळवण्या योग्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी सुमारे १४० किलो वजनाच्या वस्तू वितळवून त्यापासून सुवर्ण नाणी तयार करण्याचा निर्णय साई संस्थानने काही वर्षांपूर्वी घेतला होता, ज्याला उच्च न्यायालयाचीही मान्यता मिळाली होती. मात्र, या निर्णयाला श्रीरामपूर येथील ॲड. संदीप कुलकर्णी यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे.ॲड. संदीप कुलकर्णी यांच्या निरीक्षणानुसार, साई संस्थानने आजवर तीन वेळा आपल्याकडील सोन्याच्या वस्तू वितळवून सुवर्ण नाणी तयार केली आहेत. ही नाणी अडीच, पाच, दहा आणि वीस ग्रॅम वजनाची असून एकूण सुमारे सदतीस किलो वजनाचे सोने या स्वरूपात वितरित करण्यात आले. त्यापैकी » पान २ वर

निकाल | मुलांनी घेतले १०० टक्के गुण

# यंदाही दहावीत मुलींचीच बाजी

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. राज्यात यंदा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला असून, यात कोकण विभागाने बाजी मारली तर नागपूर विभागाचा निकाल सर्वात कमी लागला. तसेच लातूर विभागाच्या निकालातही यंदा घसरण झाली. परंतु लातूरमधील ११३ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळविल्याने पुन्हा लातूर पॅटर्नची



चर्चा सुरू झाली. या परीक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ टक्के असून मुलांची टक्केवारी ९२.३१ टक्के आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची आज दुपारी १ वाजता पत्रकार परिषद पार » पान २ वर

### नापास विद्यार्थ्यांना मिळणार ११ वीत प्रवेश

एटीकेटी असल्यामुळे एक किंवा दोन विषयात विद्यार्थी नापास झाला तरी ११ वीत प्रवेश दिला जातो. १२ वी ला जाण्यापूर्वी फेब्रुवारीतील परीक्षा उत्तीर्ण झाला आणि ११ वीची परीक्षा पास झाला तर विद्यार्थी १२ वीसाठी प्रवेश घेण्यास पात्र ठरू शकतो.

### लातूर विभागात ४४६ शाळांचा १०० टक्के निकाल

लातूर विभागात ४४६ शाळांचा शंभर टक्के निकाल लागला. तर दहा शाळांचा शून्य टक्के निकाल लागला. शून्य टक्के निकाल लागलेल्या शाळांमध्ये लातूर आणि नांदेडमधल्या प्रत्येकी चार तर धाराशिव जिल्ह्यातील दोन शाळांचा समावेश आहे. लातूर विभागीय मंडळाचा दहावीचा एकूण निकाल ९२.७७ टक्के लागला.

# पाकचे आंतकीस्तान झाले

## चर्चेतले:शिवसेनेच्या खा. चतुर्वेदिंचा घणाघात

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पाकिस्तानकडून केल्या गेलेल्या शस्त्रसंधीच्या उल्लंघनावर सडकून टीका केली आहे. पाकिस्तान आता पाकिस्तान राहिले नसून आतंकीस्तान झाले आहे अशी टीका प्रियंका चतुर्वेदी यांनी केली आहे.

प्रियंका चतुर्वेदी पुढे म्हणाल्या, पाकिस्तानकडून आपल्या इथल्या सामान्य नागरिकांवर हल्ले होत आहेत. त्या देशांनी हे पाहायला पाहिजे, » पान २ वर

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भूमिकेशी सहमत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे म्हटले की पाकिस्तानसोबत जर काही बोलणी झाली तर त्यात केवळ पीओकेवरच बोलणे होईल. तसेच पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादी कारवाया करणे बंद करत नाही तोपर्यंत त्यांच्यासोबत कोणतेही बोलणे केले जाणार नाही, असे मोदींनी स्पष्ट केले आहे. भारतीय जनतेची सुद्धा तीच भावना आहे असेही प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या.

## सर्वोच्च सातत्य!

आपल्या देशात लोकशाही आणि कायद्याचे राज्य कायम राखण्यासाठी राज्यघटनेने एक सांविधानिक चौकट आखून दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालय हे या संविधानाचे राखणदार. त्या न्यायालयात स्वत: महत्त्वाच्या प्रकरणांवर निवाडे करतानाच, अन्य ३०– ३२ न्यायमूर्तींपैकी कोणी कोणती प्रकरणे हाताळावीत हे ठरवण्याचे कामही सरन्यायाधीशांचे असल्याने हे पद महत्त्वाचे. तरीही पंतप्रधानांची जशी तुलना होते तशी सरन्यायाधीशांची होत नाही. होऊही नये– याचे एक कारण या पदापर्यंत पोहोचणाऱ्या व्यक्ती काहीएक पल्ला गाठूनच इथवर पोहोचलेल्या असतात हे. पण दुसरे कारण अधिक तगडे. ते असे की, या पदावरील व्यक्तीमुळे आता पदाचीच शोभा जाते की काय असे वाटण्याचे प्रसंग आले, तरी त्यांच्या जागी येणाऱ्या व्यक्ती पुन्हा त्या पदास वैभव प्राप्त करून देण्यास समर्थ असतात. या अनुभवाचा इतिहास ताजा आहे. गेल्या काही काळात स्वत:बाबतच्या वादाचे प्रकरण स्वत:च्याच न्यायालयात चालवून स्वत:ला दोषमुक्त करणारे सरन्यायाधीश आपण पाहिले. पण हा अपवादच हे त्यांच्या नंतरच्यांनी सिद्ध केले. गणपतीच्या आरतीमुळे सरन्यायाधीशांवर दबाव येईल का अशी शंका जरी आली, तरीदेखील बुद्धीची उपासना पूजा–आरतीसारख्या कर्मकांडांपेक्षा वास्तवाला सजगपणे प्रतिसाद देण्यातूनच चोखपणे होत असते, हे पुढल्या सरन्यायाधीशांनी – मंगळवारी निवृत्त झालेले न्या. संजीव खन्ना यांनी– दाखवून दिले. आता हे पद न्या. भूषण गवई यांच्याकडे येण्याचे स्वागत करताना 'ते महाराष्ट्राचे सुपुत्र' यासारख्या कारणांनी अभिमान वाटणे साहजिकच. पण त्याहीपेक्षा संविधानाची सर्वोच्चता म्हणजे काय याचे अचूक भान न्या. गवईंनाही न्या. खन्ना यांच्याप्रमाणेच असल्यामुळे हा खांदेपालट सुकर होईल, हे अधिक महत्त्वाचे. न्या. खन्ना यांच्याप्रमाणेच न्या. गवईंनाही सहा महिन्यांचा कालखंड मिळेल. पण पद कमी कालावधीसाठी मिळाले म्हणून काही बिघडते काय?

नाही, असे उत्तर न्या. खन्ना यांनी कृतीतून दिलेले आहे. वास्तवाला सजग प्रतिसाद देण्यासाठी आधी वास्तव काय आहे हे जाणून घेण्याची आरपार दृष्टी लागते. ती होती, म्हणून तर निशिकांत दुबे यांच्या बेजबाबदार वक्तव्याचे प्रकरण समोर आले असताना 'संसद नव्हे, संविधानच सर्वश्रेष्ठ' इतका स्पष्ट निर्वाळा त्यांनी दिला. दुबे यांच्यासारख्या वावदुकांवर कारवाई केल्यास ते उलट्या बोंबा ठोकतात, मग भक्तमंडळी त्यांच्याच बाजूने उभी राहातात हे सध्याचे वास्तव आहे. ते ओळखून व्यक्तीऐवजी प्रवृत्तीवर नेमका प्रहार न्या. खन्ना यांनी केला. असेच दुसरे प्रकरण राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे. 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी सुरू होणाऱ्या या प्रास्ताविकेत 'भारताचे सार्वभौम, लोकशाही गणराज्य' अशा शब्दांऐवजी इंदिरा गांधी यांनी घोषित केलेल्या आणीबाणीदरम्यान, ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे 'भारताचे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाही गणराज्य' अशी शब्दयोजना करण्यात आली. म्हणजेच धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे दोन्ही शब्द 'नंतर घुसडण्यात आलेले' आहेत, त्यामुळे ते अनैसर्गिक आहेत असा आधी प्रचार अनेकांनी चालवला होता आणि मग ४४ वर्षांनी, २०२० मध्ये याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिकाही गुदरण्यात आली. वास्तविक या ४२ व्या घटनादुरुस्तीचे प्रकरण सन १९८० पूर्वीच 'मिनर्व्हा मिल्स प्रकरणा'तून सर्वोच्च न्यायालयापुढे आले होते. तेव्हाचे सरन्यायाधीश यशवंत चंद्रचूड यांनी त्या प्रकरणात राज्यघटनेच्या 'पायाभूत चौकटीच्या सिद्धान्ता'ची अर्थात बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिनची स्पष्टता दिली. 'धर्मनिरपेक्ष, समाजवादी' हे शब्द जोडणे 'अनावश्यक' आहे अशी टीका त्याच वेळी थोर विधिज्ञ नानी पालखीवाला यांनीही केलेली होती. पण 'वुइ द पीपल' या पुस्तकात यासंदर्भात ''शेक्सपिअरच्या हॅम्लेट या नाटकातील 'उरली आहे ती शांतता!' हे प्रभावी वाक्य बदलून 'उरली आहे ती संपूर्ण, विचित्र आणि गोंधळवाणी शांतता' असे करण्याचे प्रयोजन नाही, तसेच हेही'' अशी सभ्य टीका आहे. ते शब्द 'घुसडलेले' आहेत म्हणून आता ते 'उचकटून' टाकावेत, असला काही आग्रह पालखीवालांनी धरला नव्हता, कारण त्यांचा आक्षेप संकल्पनांना नसून 'कमी शब्दांतल्या प्रास्ताविकेचा डौलच जातो' असा होता! कुठे पालखीवाला आणि कुठे आताचे 'बुलडोझर न्याय' करू पाहणारे राजकारणी. पण या अशा आजच्या वातावरणातही 'ते शब्द आम्ही काढणार नाही, कारण या संकल्पना संविधानाचा अविभाज्य भागच आहेत' असे अवघ्या सहा पानी मुद्देसूद निकालपत्रातून ठणकावण्याचे धैर्य न्या. खन्ना यांनी दाखवले होते. बदलत्या आणि अधिकच आव्हानदायी काळातही न्याय आणि त्यामागची आधारभूत तत्त्वे कायम ठेवण्याचे हे धैर्य मोठे ठरते.

काळ बदलणारच– पण तो आव्हानदायी म्हणायचा, याचे कारण आजकाल न्यायालयीन कामकाजात सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महान्यायअभिकर्ता आदी पदांवरल्या व्यक्तींकडूनही केले जाणारे वावदूक युक्तिवाद हेही आहे. अलीकडचे उदाहरण म्हणजे वक्फ मंडळांवर बिगरमुस्लिमांच्या नियुक्तीची विचित्र सक्ती करणाऱ्या कायद्याची वैधता न्यायालयाकडून तपासली जात असताना, 'जर त्या मंडळांवर फक्त मुस्लीम सदस्यच हवे असतील तर मग काय वक्फबद्दलचे खटलेसुद्धा फक्त मुस्लीम न्यायमूर्तींसमोरच चालवायचे का?' असा खोचक प्रश्न महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी उपस्थित केला तेव्हा 'आम्ही न्यायासनावर असतो तेव्हा आम्हाला कोणताही धर्म नसतो. आम्ही धर्मनिरपेक्षच (सेक्युलर) असतो' अशा शब्दांत न्या. खन्ना यांनी त्यांना गप्प केले होते. हे वक्फ दुरुस्ती कायद्याचे प्रकरण धसाला लावूनच न्या. खन्ना निवृत्त होणार, अशी अटकळ त्या वेळी बांधली गेली. प्रत्येक सरन्यायाधीश असे एखादे खास प्रकरण अखेरच्या दिवसासाठी राखून ठेवतात आणि मग तो खास निकाल हाच त्यांच्या निवृत्तीचा गाजावाजा होण्यासाठी पुरेसा असतो, असा अनुभव अनेकदा आल्याने त्या अटकळीत काही गैर नव्हते. पण न्या. खन्ना हे एकंदरच गाजावाजापासून इतके दूर राहणारे की, त्यांनी अशा प्रकारे कोणताही निकाल अखेरच्या दिवसासाठी ठेवला नाही. एरवीही सामान्यजनांत न मिसळता तज्ज्ञांच्या परिसंवादांतच त्यांचा सहभाग अधिक दिसला.

# आठवण येणं साहजिक

भारत आणि पाकिस्तानमध्ये आतापर्यंत चार वेळा युद्ध झाले आहे. हे युद्धे १९४७, १९६५, १९७१ आणि १९९९ मध्ये झाली. यापैकी तीन युद्धे काश्मीरच्या मुद्द्यावरून झाली.१९४७–१९४८ चे युद्ध भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीरच्या भूभागावरून संघर्ष झाले.१९६५ साली देखील काश्मीरच्या मुद्द्यांवरूनच युद्ध झाले.१९७१ साली पूर्व पाकिस्तानात (आताचा बांगलादेश) झालेल्या राजकीय आणि सामाजिक अशांततेमुळे झाले.१९९९ साली जम्मू आणि काश्मीरमधील कारगिलच्या उंच डोंगराळ प्रदेशात झाले, जिथे पाकिस्तानी सैन्याने घुसखोरी करून भारतीय चौक्यांवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला होता. भारताने १९७१ च्या युद्धात पाकिस्तानचा निर्णायक पराभव केला आणि बांगलादेशची निर्मिती झाली.१९७१ चे भारत– पाकिस्तान युद्ध मुख्यत: बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढाईमुळे झाले. या युद्धामागची अनेक कारणं होती, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक कारणांचा यात समावेश होता. या कारणांमध्ये, पूर्व पाकिस्तानमधील बंगाली लोकांवर होणारे अन्याय, राजकीय अस्थिरता, आणि पाकिस्तान सरकारचा पूर्व पाकिस्तानकडे दुर्लक्षित दृष्टिकोन यांचा समावेश होता. पाकिस्तानमध्ये बंगाली लोकांची सांस्कृतिक आणि भाषिक ओळख डावलून त्यांना अन्याय सहन करावा लागत होता. पश्चिम पाकिस्तानच्या राजकारणात आणि अर्थव्यवस्थेत त्यांचे प्रतिनिधित्व कमी होते, ज्यामुळे ते आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या दुर्लक्षित होते. पाकिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता आणि सत्तासंघर्षाची परिस्थिती होती. यामुळे, पाकिस्तानमध्ये प्रशासन व्यवस्थित काम करत नव्हते आणि जनतेला न्याय मिळत नव्हता. त्याला न्याय दिला तो भारताने.स्वतंत्र बांगलादेश करून.आताही पाकिस्तानची परिस्थिती जास्त काही वेगळी नाही.आजही पाकिस्तानात राजकीय अस्थिरता आणि आर्थिक स्थिती बिकट आहे. बांगलादेशाच्या निर्मितीपूर्वी पाकिस्तान सरकारने पूर्व पाकिस्तानकडे लक्ष दिले नाही, ज्यामुळे ते आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिले. त्यामुळे बंगाली लोकांमध्ये असंतोष वाढत गेला होता . भारताने पूर्व पाकिस्तानच्या स्वातंत्र्य लढाईला समर्थन दिले. भारतीय लष्कराने मदत केली आणि पाकिस्तानी सैन्याशी थेट संघर्ष केला. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पाकिस्तानशी संघर्ष केला. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारताच्या हवाईतळांवर हल्ला केला आणि



या हल्ल्याने युद्ध सुरू झाले. त्यानंतर भारताने पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानवर हल्ला केला. भारताने या युद्धादरम्यान पाकिस्तानला हरवले आणि पूर्व पाकिस्तान स्वतंत्र होऊन बांगलादेश म्हणून ओळखला गेला. या युद्धाने भारत आणि पाकिस्तानच्या संबंधांवर मोठा परिणाम झाला. १९७१ चे भारत–पाकिस्तान युद्ध हे इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकले. या युद्धाने पूर्व पाकिस्तान वेगळे होऊन बांगलादेश म्हणून स्वतंत्र देश निर्माण झाला आणि पाकिस्तानचे दोन तुकडे झाले.१९७१ मध्ये, पूर्व पाकिस्तानमध्ये नागरिकांनी पाकिस्तान सरकारविरुद्ध एक मोठे आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला 'बांगलादेश मुक्ति युद्ध' असे म्हटले जाते. आताही पाकिस्तानचा बलुचिस्तान भाग पाकपासून स्वतंत्र मिळविण्यासाठी लढत आहे.

भारतातील जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय नागरिकांवर २२ एप्रिल रोजी हल्ला केला.त्याचा बदला घेण्यासाठी भारताने लष्करी कारवाई केली.पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यात पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची नऊ तळ उद्धवस्त केली.भारतीय सैनिकांच कौतुक करावं तितकं कमीच.पण, भारताला पाकिस्तानची राख रांगोळी करण्याची ही एक संधी होती.ती गमावली?कारण, भारताच्या बाजूने अनेक देश उभे होते . ऑपरेशन सिंदूरला दहशतवादाविरुद्ध भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा पाठिंबा होता. ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी भारताच्या दृष्टिकोनाला आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मोठा पाठिंबा मिळाला आहे. अमेरिका, ब्रिटन, इस्त्रायल, सौदी अरेबिया, कतार , युएई व इतरही देशांनी भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे.खरं तर दहशतवादाविरुद्ध सर्वांनी लढले पाहिजे.मात्र, पाकिस्तान दहशतवादाला आजपर्यंत आश्रय देत आला आहे.हे लपून राहिलेले नाही.

ऑपरेशन सिंदूर हे पाकिस्तानविरुद्ध नाही हे भारतीय लष्कराने केलेल्या कारवाईतून लक्षात येते. कारण, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवाद्यांला टार्गेट केले आहे.तेथील सैनिकांना किंवा नागरिकांना नाही हे भारताचे धोरण आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुकास्पद. मात्र, याउलट पाकिस्तान दहशदवाद्यांसोबत पाकिस्तानी सैनिक उभे असल्याचे जगाने पाहिले आहे. तर पाकिस्तानातील बलुचिस्तान भाग भारताने पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याबाबत आनंदी होता. त्यामुळे बलुचिस्तानला स्वतंत्र करता आले असते. तत्कालीन म्हणजे १९७१ च्या युद्धावेळी महासत्ता अमेरिका भारताच्या विरोधात असताना पाकिस्तानचे दोन तुकडे करण्यात भारताला यश आले. अमेरिका पहिल्यापासूनच पाकिस्तानचा मित्र देश होता व भारताने सोविएत संघाशी मैत्रीचा करार केल्याने भारत



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

तत्कालीन परिस्थितीत त्याच्या शत्रुपक्षात गेला. भारताने जर पाकिस्तानवर विजय मिळवला व पाकिस्तानवर कब्जा मिळवला तर अमेरिकेचा दक्षिण आशियामध्ये प्रभाव कमी होऊन सोव्हिएट प्रभाव वाढेल असा कयास होता. म्हणून अमेरिकेने पाकिस्तानला सर्व आघाड्यांवर मदत केली होती. आजही अमेरिकेची भूमिका संभ्रमात टाकणारी आहे.पण, पाकिस्तानला पाठिंबा नव्हता ही भारताची मुत्सद्देगिरी म्हणावी . यात दुमत नाही.परंतू,१९७१ साली तर अमेरिकाचा पाठिंबा पाकिस्तानला होता. तरिही भारताने पाकिस्तानचा लचका तोडला. कारण,ती मागणीही होती. पाकिस्तानात वेगळ्या बांगलादेशच्या मागणीला भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी पूर्व पाकिस्तानमधील या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यांनी पूर्व पाकिस्तानमधील लोकांना मदत करण्याची ग्वाही दिली आणि पाकिस्तानी सैन्याच्या अत्याचाराचा निषेध केला. पाकिस्तान सरकारने पूर्व पाकिस्तानमध्ये मोठे लष्करी कारवाई केली, ज्यामुळे अनेक नागरिक मारले गेले आणि अनेक लोक भारतात स्थलांतरित झाले. या स्थितीत, भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले, १३ दिवसांपर्यंत चालले. भारताने या युद्धात पाकिस्तानला पराभूत केले आणि पूर्व पाकिस्तान स्वतंत्र झाला. या विजयानंतर बांगलादेश नावाचा नवीन देश निर्माण झाला. या युद्धाच्या वेळी भारताच्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी होत्या. त्यांनी या युद्धाच्या यशामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे त्यांना 'लोह महिला' म्हणून ओळखले जाते. १९७१ चे युद्ध भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे युद्ध म्हणून ओळखले जाते. या युद्धाने भारताला एक मोठे यश मिळवून दिले आणि पाकिस्तानला मोठा धक्का दिला. १९७१ चे युद्ध हे इंदिरा गांधी यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्वाची घटना. इतकेच नव्हे तर एप्रिल १९७१ मध्ये श्रीमती गांधींनी युरोपचा झंजावाती दौरा केला. ९ ऑगस्ट १९७१ रोजी श्रीमती गांधींनी रशियाशी २० वर्षाचा मैत्रीचा करार करून सर्व जगाला खासकरून अमेरिकेला, ब्रिटन व फ्रान्ससारख्या देशांना धक्का दिला. या मैत्रीने चीनची युद्धात उतरून मध्यस्थी करण्याची हिंमत झाली नाही . चीन हा पाकिस्तानचा मित्र देश असला तरी त्याने युद्धकाळात तटस्थ राहणे पसंत केले होते.आज मात्र, चीन उघड उघड पाकिस्तानची बाजू घेत आहे.हे आपले परराष्ट्र धोरणाचे अपयश?असो, मात्र इंदिरा गांधी यांच्या या धाडसाचं कौतुक कितीही केलं तरी कमीच होईल. यामुळे इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाची चर्चा जगभर झाली. सध्याची परिस्थिती तीच होती. पण, इंदिरा गांधी यांच्यासारख्या कणखर नेतृत्वाची क्षमता कदाचित नव्हती .छप्पन इंच छाती भारताला नव्हे तर पाकिस्तानला दाखविण्याची हीच ती वेळ ती दडवली.पाकिस्तानचा बलुचिस्तान भाग स्वतंत्र करून १९७१ च्या विजयाची पुनरावृत्ती होऊ शकली असती. पाकिस्तानचा लचका तोडून स्वतंत्र बलुचिस्तान करण्यासाठी इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाची आठवण येणं साहजिक आहे!

## पान एक वरून

**आंतरजातीय विवाह केल्यास**

सुरक्षा पुरविण्यात यावी. काही काळ त्यांना राहण्यासाठी सुरक्षागृह ही प्रत्येक जिल्ह्यात तयार करण्यात यावीत. शासकीय विश्रामगृह असेल तर त्या ठिकाणी व्यवस्था करावी. जर शासकीय विश्रामगृह नसेल तर भाडेतत्त्वावरती घर खरेदी करून त्यांची व्यवस्था करण्यात यावी, असे सूचित करण्यात आले आहे.

**नववधूचं प्रियकरा सोबत**

रात्री या नववधूने रात्री नैसर्गिक विधीला जाण्याच्या बहाण्याने भावजयीचा मोबाईल घेतला आणि माहेरच्या गावाशेजारीच असलेल्या प्रियकराशी मोबाईल वरून संपर्क साधला. दरम्यान उन्हाळ्याचे दिवस असल्याने ती एकटीच घरात झोपली व तिचे इतर सर्व नातेवाईक अंगणात झोपी गेले. सोमवारी पहाटे नवरी मुलगी झोपलेल्या घरातील वीज दिवे बंद असल्याचे तिच्या आईला दिसून आले. त्यामुळे तिने घरात जाऊन पाहिले असता मुलगी आढळून आली नाही नंतर जवळच्या नातेवाईकांकडे सर्वत्र तिचा शोध घेतला असता नववधू कोणाकडेही आढळली नाही. अखेर मुलीच्या भावाने केज पोलिस ठाण्यात नववधू असलेली बहीण हरवल्याची तक्रार सोमवारी दिली. या नववधूने प्रियकरासोबत पळून जाताना सासरच्या मंडळीने लग्नात घातलेले झुंबर, मंगळसूत्र व इतर दागिन्यासह स्वतःचे एटीएम कार्ड, क्रेडिट कार्ड आणि मोबाईलसह पोबारा केला आहे. या घटनेमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

**महाराष्ट्रात बॉम्बस्फोटची**

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र पोलीस नियंत्रण कक्षाला एक धमकीचा ईमेल मिळाला आहे. या मेलमध्ये असे म्हटले आहे की, पुढील २ दिवसांत एक मोठा बॉम्बस्फोट होणार आहे. नियंत्रण कक्षाने हा मेल मुंबई पोलिसांना पाठवला आहे. ईमेल मिळाल्यानंतर पोलिस विभागात खळबळ उडाली आहे.मुंबई पोलिस प्रशासनाने या ईमेलला गांभीर्याने घेण्याचा इशारा दिला आहे. सध्या पोलिस सदर ईमेल आयडी ट्रॅक करण्याचा प्रयत्न करत आहेत. ईमेल पाठवणा–याचे स्थान देखील अद्याप ट्रॅक झालेले नाही. मात्र, यानंतर मुंबई पोलिस अधिक सतर्क झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसोबतच, ईमेल पाठवणा–या व्यक्तीचाही शोध घेतला जात आहे.

**शेतकऱ्यांना वाऱ्यावर**

असताना सरकार शेतक–यांच्या पाठीशी उभे आहे. सरकारला काटकसर करावी लागली. या बजेटमध्ये काही खात्यांना निधी कमी मिळाला. मात्र, पुढच्या जुलै पुरवणी बजेटमध्ये भरून काढू. कुठल्याही खात्यावर अन्याय करण्याची भावना सरकारची नाही, असे ते म्हणाले.

**आता पशुसंवर्धनमध्ये समुपदेशनाने**

होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे. समुपदेशनाने बदलीची कार्यपध्दती पार पाडताना ती पारदर्शकपणे पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यामध्ये बदलीसाठी निर्धारित करण्यात आलेली पदे, दिव्यांग, गंभीर आजार असलेले कर्मचारी, असक्षम पाल्य, विधवा किंवा परित्यक्ता असलेल्या महिला, पती–पत्नी एकत्रिकरण अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बदलीपात्र अधिकाऱ्यांची वर्गवारीनिहाय जेष्ठता यादी व बदलीसाठी उपलब्ध पदे यांची यादी विभागाच्या पशुसंवर्धन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याची लिंक सर्व संबंधित अधिकाऱ्यांनाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर वर्गवारीतील जेष्ठ अधिकाऱ्यांस बदलीचे ठिकाण निवडण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

**साई संस्थान तिजोरीत**

सुमारे पाच किलो वजनाची नाणी अद्याप शिल्लक आहेत. दरवर्षी केवळ दोन ते तीन किलो सोन्याच्या नाण्यांचीच विक्री होते. हे लक्षात घेता, नव्याने तयार करण्यात येणा–या नाण्यांची विक्री होण्यासाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे, ज्यामुळे त्यासंबंधित जोखीमही वाढू शकते.

**यंदाही दहावीत मुलींचीच**

पडली. या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दहावीच्या निकालाची माहिती दिली. या परीक्षेला राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या ९ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात १०० टक्के गुण मिळवलेले विद्यार्थी २११ आहेत. त्यात पुण्यातील १३, नागपूरमधील ३, संभाजीनगर ४०, मुंबई ८, कोल्हापूर १२, अमरावती ११, नाशिक २, लातूरमधील ११३, कोकण ९ विद्यार्थी आहेत. या सोबत ३५ टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पुणे ५९ विद्यार्थी, नागपूर ६३ विद्यार्थी, छत्रपती संभाजी नगर २८ विद्यार्थी, मुंबई ६७ विद्यार्थी, कोल्हापूर १३ विद्यार्थी, अमरावती २८ विद्यार्थी, नाशिक ९ विद्यार्थी, लातूर १८ विद्यार्थी, कोकण ० विद्यार्थी, एकूण २८५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.विद्यार्थ्यांच्या गुणाबद्दल काही शंका असेल तर विद्यार्थ्यांना गुण पडताळणी करण्याची सोयदेखील करून दिली आहे. उद्यापासून म्हणजे १४ मे पासून २८ मे पर्यंत गुण पडताळणी करता येईल. यासाठी विद्यार्थ्यांना मंडळाकडे ऑनलाईन अर्ज करता येईल. यासाठी विद्यार्थ्यांना फी भरावी लागणार आहे. गुण पडताळणीसाठी एका विषयासाठी ५० रुपये भरावे लागणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**पाकचे आंतकीस्तान झाले**

ज्यांनी आयएमएफला कर्ज दिले आहे, जे देश म्हणतात की आम्ही त्यांच्यासोबत व्यापार करणार, त्यांनी बघायला पाहिजे की पाकिस्तान एक धूर्त देश आहे. पाकिस्तान आता पाकिस्तान कमी आणि आतंकीस्तान बनला आहे अशी टीका त्यांनी केली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केली. अमेरिकेच्या मध्यस्थीवरही प्रियंका चतुर्वेदी यांनी टीका केली आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी हे लक्षात ठेवायला हवे की ७/११ च्या हल्ल्यामागे असलेला ओसामा बिन लादेन पाकिस्तानमध्येच सापडला होता. मुंबई येथे २६/११ च्या हल्ल्यात अमेरिकेचे देखील नागरिक मारले गेले होते. ऑपरेशन सिंदूरमध्ये मारले गेलेल्या आतंकवाद्यांचे अंतिम संस्कार करताना अब्दुल रऊफ हा पाकिस्तानी लष्करासोबत उपस्थित होता. अब्दुल रऊफ हा अमेरिकेचा मोस्ट वॉन्टेड आतंकवादी आहे.

## पान सहा वरून

**पाटोद्यात अवकाळी पावसाचा**

अशक्य झाले. नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, अनेकांनी शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडण्याची चिंता आता डोके वर काढत आहे. शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत आणि योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. तालुका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी स्थानिकांची मागणी आहे.हवामानातील या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा संकट उभं राहिलं असून, शासनाच्या मदतीशिवाय सावरणं कठीण असल्याचे स्पष्ट होत आहे.

**धामणगाव परिसराला**

अक्षरश: दाणादाण उडाली. या पावसाने शेतात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा आणि वाळण्यासाठी टाकलेल्या भुईमुगाच्या शेंगा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी त्रेधातिरपीट उडाल्याचे दिसून आले. सलग दोन ते अडीच तास झालेल्या जोरदार पावसामुळे या परिसरात चाऱ्याच्या गंजी तर काही ठिकाणी घरावरचे पत्रे उडाले असल्याचे धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब निकम यांनी प्रतिनिधीला सांगितले.

**मलकापूर दत्त मंदिराचा**

दत्त मंदिर संस्थान अस्तित्वात नसताना देवस्थान ट्रस्टीचे खोटे दस्तऐवज,प्रोसोडिंग घेऊन सातबाराच्या आधारे फेरफार करण्यात आल्याचा शेतकरी सुंदर लोमटे यांचा आरोप असून फेरफार करण्यासाठी सर्व दिलेली कागदपत्रे बनावट असल्याचे म्हटले आहे वारंवार कागदपत्रे पुरावे सादर करूनही दंडाधिकारी महसूल विभागाने चुकीचा निर्णय देऊन फेरफार केल्याने हा फेरफार खोट्या कागद पत्रावरून व आर्थिक व्यवहार करून केला असल्याचे सुंदर लोमटे यांचे म्हणणे असून याप्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक ८ मे पासून मलकापूर येथील सुभाष महाराज लोमटे यांच्या समाधीस्थळी आमरण उपोषणाला बसले असून आज पाचवा दिवस आहे तरीपण कुठल्याही प्रशासनाचे अधिकारी किंवा कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांनी उपोषण स्थळी भेट दिली नाही श्रीक्षेत्र दत्त मंदिर मलकापूर येथे हे चुकीच्या पद्धतीने फेरफार क्रमांक ६६३ सातबारावर घेण्यात आलेला आहे खोटी कागदपत्र बनवून दस्तऐवज दाखल करून फेर घेण्यात आलेला आहे बनावट कागदपत्रे दाखल करणारे व फेरफार तयार करणारे संबंधित अधिकारी यांच्यावर ४२० चे गुन्हे दाखल व्हावे म्हणून उपोषणाला बसलेले सुंदर यांचा आजचा पाचवा दिवस आहे दोन दिवस वादळीवाऱ्यासह प्रचंड पाऊस आला तरी देखील ते जागेवरून हल्ले नाही भर पावसात देखील त्यांचे उपोषण त्यांच्या न्याय मागण्यासाठी चालू आहे याची प्रशासनाने अद्याप दखल घेतलेली नाही त्यामुळे प्रशासनावर सुंदर लोमटे यांच्यासह मलकापूर येथील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे प्रशासन काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**बुद्धांनी जगाला विज्ञानवादी**

स्थापन केलेल्या धर्माला बौद्ध धर्म असे म्हणतात या कार्यक्रमात श्री गजानन जाधव श्री सुदन अंभोरे यांनीही आपले विचार मांडले याप्रसंगी कैलाश अंभोरे, सिद्धार्थ अंभोरे, श्रीकांत मादनकर, तानाजी मापारी, विनायक मापारी, लूकमान कुरेशी, अमोल सुटे, भारत राठोड, मंगेश मोरे, योगेश भुक्कन, संजय नेवरे, लक्ष्मण डोंगरदिवे, दीपक अंभोरे, उमेश मोरे, कैलास मोरे, शुभम मोरे, विनोद सरदार आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी अंभोरे यांनी केले तर आभार कैलास अंभोरे यांनी मानले आणि प्रसाद म्हणून खीर वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**जगाला युद्ध नाही तर**

आकाश घेवंदे,सागर पनाड, राजेश जावळे, निवृत्ती जावळे, राजहंस जावळे, गौतम पनाड, राजरत्न पनाड , डि.के.पनाड, सुधाकर पनाड ,राजेश जावळे, सुबोध घेवंदे, राहुल शेजुळ, गजानन जावळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागवंशी संघटन, भीम योद्धा ग्रुप, माता रमाई महिला मंडळ यांनी परिश्रम घेतले

**पाटोदा शहरात बुद्ध**

संजय जावळे, डॉ. नरेंद्र जावळे, रमेश जावळे, सूर्यकांत जावळे पाटील, यांच्यासह महिला उपासिका आणि शहरातील अनेक मान्यवर, नागरिक व धम्मनिष्ठ बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बौद्ध समाजाच्या कार्यकर्त्यांनी उत्कृष्ट संयोजन केलेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी तथागत बुद्धांच्या करुणा, अहिंसा, समता आणि शांतीच्या विचारांचा जागर करत समाजात बंधुता व सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे आवाहन केले.

**परमार्थात खरे सुख**

गायणाचार्य, भालदार ,चोपदार, विणेकरी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान पुढे बोलताना सुरेशानंदजी शास्त्री म्हणाले की, जीवनात साधू संतांच्या आशीर्वादाची गरज आहे. आज खऱ्या अर्थाने साधू संतांच्या कृपेने भव्य दिव्य सप्ताह झाला. हे सर्व श्रेय आडगावकराचे आहे. तसेच आई वडिलांची , साधू संताची सेवा करा असे आवाहन त्यांनी शेवटी बोलताना व्यक्त करुन श्रृंगऋषी गडाच्या पहिल्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता झाली, सांगता सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी गडाचे टाळकरी, वारकरी, मृदंगाचार्य, गायणाचार्य , भालदार, चोपदार, विणेकरी सह पंचक्रोशीतील भजनी मंडळ उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी, आडगाव यांनी आठ दिवस परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## डोळे तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**डोंबिवली :** रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंडतर्फे मोफत डोळे तपासणी व चष्मा शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरात डोळे तपासणी शिबीर मानपाडा रोडवरील मायमाऊली सोसायटीमधील रोटरीयन निलेश गोखले यांच्या कार्यालयात आयोजित केले होते. अनेक नागरिकांनी याचा लाभ घेतला. यावेळी रोटरी क्लब डायमंडचे रोटरीयन उपस्थित होते. डोळे तपासणी करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील नेत्र तज्ज्ञ डॉ. चिंन्मय बने व सहकारी उपस्थित राहून योग्य तऱ्हेने डोळे तपासणी व सल्ला देत होते.

# वेचक

## मातृदिनानिमित्त आदिवासींसाठी विशेष कार्यक्रम

**कल्याण :** आसरा फाऊंडेशनच्या वतीने शहापूर येथे मातृदिनाचे औचित्य साधून येथील आदिवासी पाड्यातील महिलांसाठी एका विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात



आदिवासी महिलांना त्यांच्या पारंपरिक कला आणि कौशल्यांचे संवर्धन करण्यासोबतच जीवनातील आव्हानांचा सक्षमपणे सामना कसा करावा, याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोहन शिरकर यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी महिला सक्षमीकरण हा विषय होता. शिरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आदिवासी समाजातील माता जर आज खऱ्या अर्थाने सक्षम झाल्या, तर त्या केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे, तर येणाऱ्या पिढीलाही योग्य दिशा दाखवू शकतील. त्यामुळे महिलांचे शिक्षण आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे अत्यंत आवश्यक आहे." त्यांनी महिलांना त्यांच्यातील उपजत कलागुणांना व्यावसायिक दृष्टिकोन देत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले. या विशेष कार्यक्रमाला अंगणवाडी शिक्षिका जयश्री चौधरी, आशा कार्यकर्त्या दिपाली चौधरी, आशा सुपरवायजर संध्या पाटेकर, आसरा फाऊंडेशनच्या सदस्या महानंदा शिरकर आणि शबाना पटेल यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

## तरुणांसाठी डोंबिवलीत भरला महारोजगार मेळावा




**डोंबिवली :**भाजपा ग्रामीण विभागातर्फे डोंबिवली पूर्व येथील स्वामी विवेकानंद स्कूल, दत्त नगर येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याचे औपचारिक उद्घाटन माजी मंत्री व भाजपाचे ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील यांनी केले. सदर मेळाव्यात सर्व प्रकारचा रोजगार उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले. मेळाव्यात नामांकित कंपन्यांचे अधिकारी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेऊन तत्काळ नियुक्ती पत्र देण्यात येत होते. या मेळाव्यात नोकरी मिळविण्यासाठी अनेक तरुण, तरुणी नोकरी उपस्थित होत्या. बहुतांशी उमेदवारांना कंपन्यातर्फे नियुक्ती लेटर देण्यात येऊन त्यांना शुभेच्छा देण्यासाठी भाजपा ग्रामीणचे नगरसेवक निलेश म्हात्रे, विसू पेडणेकर, टावरेसह भाजपा पूर्व मंडल उपाध्यक्ष पंढरीनाथ म्हात्रे आणि पदाधिकारी उपस्थित होते. तसेच कार्यकर्ते इच्छुक नोकरी मिळविण्यासाठी आलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन करताना दिसत होते. दत्तनगर व तुकाराम नगर परिसरात कायमस्वरूपी नोकरीसाठी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येत असून त्याचेही उद्घाटन केले.

## सिलिंडरच्या स्फोटात ४ दुकाने जळून खाक; सुदैवाने जीवितहानी नाही

**कल्याण :** सिलिंडरच्या स्फोटात ४ दुकाने जळून खाक झाली असून, यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहीती समोर आली आहे. कल्याण पश्चिमेतील आंबेडकर रोड येथील एका वेल्डिंग



दुकानात सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागली, ज्यामुळे आणखी चार दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. या आगीत कोणीही जखमी झाले नाही; परंतु लाखो रुपयांचे सामान जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. रविवारी पहाटे साडेपाच वाजता कल्याण पश्चिमेतील आंबेडकर रोडवरील लोहार गली येथील वेल्डिंग दुकानात ठेवलेल्या सिलिंडरचा अचानक स्फोट झाला आणि आग लागली. गौसिया चाळमधील दुकान क्रमांक एक, जिथे क्लासेस चालत होते, ते पूर्णपणे जळून खाक झाले, तर कमरुद्दीन शेख आणि निजामुद्दीन सय्यद यांच्या सोफ्यावरील दुकानाच्या दोन दुकानेही आगीत जळून खाक झाली. यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ही घटना पहाटे घडल्याने येथे वर्दळ फार कमी होती. त्यामुळे पुढील दुर्घटना टळली असल्याचे येथील रहिवाशांकडून सांगण्यात येते. अग्निशमन दलाचे अधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले की, अग्निशमन दलाला सायंकाळी ५:३७ वाजता फोन आला आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पाण्याचे टँकर घटनास्थळी पोहोचले. गॅस सिलेंडरमध्ये उष्णता असल्याने आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याचे त्यांनी सांगितले. हा स्फोट एका वेल्डिंग दुकानात झाला असल्याने, आग आजूबाजूच्या भागात वेगाने पसरली, ज्यामुळे आणखी चार दुकाने जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत जीवित हानी झाली नाही.

# राष्ट्रीय लोक अदालत प्रकरण निकालात ठाणे जिल्ह्यात अव्वल

### ९८,८९९ प्रकरणे निकाली काढून १,१२,३०,८४,६३६ एवढ्या रकमेची झाली तडजोड

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयात भरवण्यात आलेली राष्ट्रीय लोक अदालत प्रकरणे सोडवण्यात राज्यात अव्वल आले आहे. या आधीही ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाने राष्ट्रीय लोक अदालतीत प्रकरणे सोडवण्यात अनेकदा राज्यात पहिला क्रमांक मिळवलेला आहे. शनिवारी झालेल्या लोक अदालतमध्ये प्रलंबित २७११८ आणि दावा दाखलपूर्व ७१७८१ प्रकरणे तडजोडीतून निकाली काढून १ अब्ज १२ कोटी ३० लाख ८४ हजार ६३६ एवढ्या रकमेची तडजोड करून पीडितांना भरपाई मिळवून दिली आहे. या प्रकरणांसोबतच ३० वर्षे, २० वर्षे, १० वर्षे अशी वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रलंबित असलेली ३१८ प्रकरणे तडजोडीतून निकाली काढली.

न्यायालयीन वाद कायमस्वरूपी व जलद निकाली काढण्यासाठी लोकअदालत व मध्यस्थी प्रक्रिया हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून वाद कायमस्वरूपी व जलद गतीने मिटला जातो. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा



प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्रीनिवास अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयांमध्ये शनिवारी (दि.१०) राष्ट्रीय लोक अदालत पार पडली.

मोटार अपघात पीडितांना मिळाला न्यायः ठाणे जिल्ह्यात मोटार अपघात दाव्याची एकूण १३१ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली. एकूण १४ कोटी ४० लाख ३८ हजार रूपयांची तडजोड.

डीआरटी प्राधिकरणाद्वारे १३७ प्रकरणे निकाली. त्यामध्ये एकूण ३९,२४,४१,१३३ रकमेची तडजोड झाली.

वैवाहिक प्रकरणे : कौटुंबिक न्यायालयातील वैवाहीक प्रकरणांमधील वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी व कौटुंबिक संबंध पुनःप्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्यामध्ये वैवाहीक वादाच्या एकूण ६१ प्रकरणांमध्ये यशस्वी समेट घडवून आणला. त्यापैकी १० प्रकरणांत पती-पत्नी पुन्हा एकत्र नांदावयास गेले.

मोठ्या रकमांची तडजोड : १३८च्या धनादेश प्रकरणांतील जुनी प्रलंबित ६८५ प्रकरणे निकाली निघून त्यात १०,७७,८७,६७३ रकमेची तडजोड झाली. किरकोळ स्वरूपाच्या फौजदारी प्रकरणात गुन्हा कबुलीस प्रतिसाद मिळाला असून जवळपास २१४०९ आरोपींनी न्यायालयासमोर गुन्हा कबुल करून दंडाची रक्कम रूपये १,०५,४९,००० जमा केली. प्रॉपर्टी टॅक्स /रेव्हेन्युची दाखलपूर्व ६०४०९ प्रकरणे निकाली. त्यातून तडजोड होऊन रकम २,१०,६८,९६७ मंजूर करण्यात आली.

> मागील काही राष्ट्रीय लोकअदालतीचा आलेख पाहिला असता नागरीकांना राष्ट्रीय लोकअदालतीचे महत्त्व पटल्याचे प्रकर्शाने दिसून येते. प्रसारमाध्यमे तसेच समाजातील प्रत्येक स्तरामध्ये करण्यात आलेल्या कायदेशीर जनजागृती शिबिरामुळे सामान्य जनतेस लोकअदालत व त्यातून होणारा न्यायनिर्णयाचे, मध्यस्थी प्रक्रियांकडे नागरीकांचा कल मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे.
>
> **- न्या. ईश्वर सूर्यवंशी**, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे

# यांना रुग्णालये म्हणायची का ?

पुणे येथील दीनानाथ या खासगी रुग्णालयात एका गरोदर महिलेला वेळेवर उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याचे उदाहरण आहे. त्याचे सर्व पडसाद महाराष्ट्रात उमटले. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. हे उदाहरण ताजे असतानाच कल्याणच्या महापालिकेच्या रुख्मिणीबाई रुग्णालयात एका महिलेला अपुऱ्या साधनाअभावी उपचार करणे अशक्य असल्याने कळवा येथील ठाणे महापालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. तेव्हा तिला नेण्यासाठी वाहन असूनही ते न मिळाल्याने तिने रुख्मिणीबाई रुग्णालयाच्या आवारातच प्राण सोडल्याची दुर्दैवी घटना घडली. यामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे.



**विनायक बेटावदकर**
**कल्याण**

डॉक्टर असूनही केवळ उपचार करायला लागणारी साधने व औषधे नाहीत असे प्रथम दर्शनी सांगितले जाते. नवीन आलेल्या महापालिका आयुक्तांनी याची तातडीने दखल घेऊन चौकशी सुरू केल्याचेही सांगितले जाते. कल्याण-डोंबिवली महापालिकेची डोंबिवलीत एक व कल्याणात एक अशी दोन मोठी रुग्णालये आहेत. पण ही दोन्ही रुग्णालये वैद्यकीयदृष्ट्या नागरिकांना किती उपयुक्त आहेत असा प्रश्न सर्वांनाच पडतो? या दोन्ही रुग्णालयांचा दर्जा नागरिकांच्या मते योग्य नसल्याने अनेकदा रुग्णाला खासगी रुग्णालयात न्यावे लागते. काहीवेळा वेळीच उपचार न मिळाल्याने रुग्ण दगावतात. अशावेळी त्यांच्या नातलगांनी रुग्णालयात गोंधळ घातल्याची, तोडफोडीची उदाहरणे पहावयास मिळतात. सविता गोविंद बिराजदार वय ४३ वर्षे यांना अत्यवस्थस्थितीत या रुग्णालयात आणण्यात आले. तेथे त्यांची प्रकृती पाहून कळव्याच्या ठाणे महापालिकेच्या रुग्णालयात नेण्याचा सल्ला डॉक्टरानी दिला. पाच तास प्रयत्न करूनही त्यांना वाहन उपलब्ध होऊ शकले नाही. त्यांना प्रथम पक्षाघाताचा झटका आला, थोड्याचवेळात ब्रेनस्ट्रोकचाही झटका येऊन त्यांची प्रकृती अधिक गंभीर बनली. महापालिका रुग्णालयात डॉक्टर होते. त्यांनी रुग्णाला तातडीने कळवा रुग्णालयात नेण्यास सांगितले. यावेळी महापालिकेच्या चार रुग्णवाहिका तेथे होत्या पण त्यातील तीन रुग्णवाहिका या सुस्थितीत नसल्याचे आढळून आले. एक रुग्णवाहिका सुस्थितीत होती. तिचा चालकही तेथेच उपलब्ध होता. त्याने वेळेचे महत्त्व व रुग्णाची प्रकृती लक्षात घेतलीच नाही. . एका रुग्णाच्या जोडीला दुसरा रुग्ण आला की गाडी काढतो असे सांगून तो स्वस्थ राहिला. रुग्णाच्या नातलगांनी १०८ क्रमाकावर संपर्क साधला पण तीही रुग्णवाहिका आली नाही. या दरम्यान सावित्रीची प्रकृती गंभीर होत गेली. यातून आज महापालिका वैद्यकीय विभागासंबंधात अनेक प्रश्न निर्माण होतात. या रुग्णवाहिका, वहाने नेमकी कोणासाठी आहेत? जर आपल्याकडील वाहन देता येत नसेल तर दुसरे वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी रुग्णालय व्यवस्थापनाची येते. ती त्यांनी पार का पाडली नाही. खासगी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न का केले नाही? या सर्व घटनांना कर्मचारी, अधिकारी व महापालिकेचा संपूर्ण वैद्यकीय विभाग जबाबदार आहे. त्यांच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल होणे जरुरीचे आहे. याची चौकशी करून दोषी व्यक्तींवर कारवाई करणे अत्यंत महत्वाचे आहे. याकडे गांभीर्याने पाहून रुग्णालय हे रुग्णाच्या मृत्यूचा सापळा होणार नाही याची काळजी घेणे जरुरीचे आहे.

# नवी मुंबई परिसरातील जोडणी मार्गांचे काम जूनमध्ये होणार पूर्ण

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पश्चिमेकडून जोडणी करण्याकरिता पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम जूनमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदलाद्वारे आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा परिचालनाच्या मार्गावर आहे. या विमानतळाला उत्तमप्रकारे जोडले जावे, याकरिता त्या परिसराच्या परिघातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळाशी जोडण्याकरिता परिधीय



मार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर जोडणी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिघातील महत्त्वाचे मार्ग आणि विमानतळ या दरम्यान व्यवस्थितरीत्या जोडले जावे, यासाठी याकरिता सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळ दरम्यान अशी जोडणी निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. तसेच आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीतरीत्या चालावी, याकरिता एमजेपीआरसीएल प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, विमानतळाच्या पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग ४ बी सोबत जोडणीसाठी पूर्व प्रवेश आंतरबदल मार्गाचा देखील समावेश करण्यात आला आहे. उन्नत विमानतळ जोड रस्त्याला जोडला गेला आहे. याशिवाय आंतरबदल मार्गावर दोन लूप आणि दोन रैम्प यांचा समावेश आहे.

# हत्या करून फरार झालेल्या महिलेसह तिघांना अटक

◆ **शहापूर (वार्ताहर):**

अनोळखी इसमाची हत्या करून फरार झालेल्या एका महिलेसह तिघांना शहापुर पोलिसांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. मृतदेहाची ओळख पटवण्यापासून हत्येखोरांचा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथून अवघ्या पाच दिवसातच पोलिसांनी छडा लावला आहे. ही हत्या करण्यात प्रेम प्रकरणातून झाली असल्याचे निष्पन्न झाले असून सिन्नर तालुक्यातील पांडुर्ली येथील वसीम पठाण, राहुल गुंजाळ व शीतल फोडसे या तिघांना शहापूर पोलिसांनी अटक केली आहे.

शहापूर तालुक्यातील मुंबई - नाशिक महामार्गावरील उंबरखांड गावच्या हद्दीत अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला होता. शहापुर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. शहापूर पोलिसांनी पांडुर्ली येथे धाव घेतली. पोलिसांनी मोठ्या शिताफीने वसीम राहुल व शीतलच्या मुसक्या आवळल्या.

# एमआयडीसी परिसरातील नाल्यांवर प्लास्टिकचे थर

◆ **नेवाळी (वार्ताहर) :**

एमआयडीसी परिसरातील नाल्यांवर प्लास्टिकचे थर साचलेले दिसून येत आहेत. येथील मान्सूनपूर्व कामे कासवगतीने होत असल्याने एमआयडीसीतील रस्त्यांचे नाले होण्याची भीती व्यक्त होत आहे.

मान्सून जवळ येत असला तरी केडीएमसीची पूर्व तयारी वेग घेताना दिसून येत नाही. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात मुख्य रस्त्यांवर गटारातील पाणी येण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. एमआयडीसीतील फेज दोनमध्ये



असलेल्या अभिनव शाळे जवळील नाल्यात प्लास्टिक, लाकडे आणि थर्माकोलचे थर जमा झाले आहेत. त्यामुळे पावसाळ्याआधी गटार साफ करण्याची गरज निर्माण झाली आहे. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यासाठी प्रशासनाकडून मान्सूनपूर्व कामांना वेग देण्यात आला आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने नालेसफाईला सुरुवात केली आहे. मात्र कल्याण ग्रामीण भागात असलेल्या डोंबिवली एमआयडीसीतील फेस दोन मध्ये अभिनव शाळेजवळील मुख्य नाल्यांमध्ये प्रचंड प्लास्टिक, थर्माकोल व लाकडाचे साहित्य दिसून येत आहे. महापालिका प्रशासनाने या मुख्य नाल्यांकडे वेळीच गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अन्यथा पावसाळ्यात मुख्य रस्ते गटारमय होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून सुरू असलेली नालेसफाई चर्चेत आली आहे.

## बाली येथे सहलीस गेलेल्या शिक्षिकेचा अपघाती मृत्यू

**कल्याण :** कल्याणमधील नामवंत बी. के. बिर्ला शाळेतील विद्यार्थी, शिक्षिकांसोबत सहलीस गेलेल्या एका शिक्षिकेचा तेथे अपघाती मृत्यू झाला आहे. या महिला शिक्षिकेच्या मृत्यूबद्दल विद्यार्थी, पालकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. सोमवारी या महिला शिक्षिकेचे पार्थिव कल्याण येथे आणले जाणार आहे. एका पर्यटन कंपनीच्या माध्यमातून शाळेने या सहलीचे नियोजन केले होते. श्वेता पाठक असे अपघातात मरण पावलेल्या शिक्षिकेचे नाव आहे. ही माहिती शाळेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

# सिद्धेश्वर तलावातील माशांचा प्रदूषणामुळे मृत्यू

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे महापालिकेच्या मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर असलेल्या सिद्धेश्वर तलावातील ५० हून अधिक माशांचा मृत्यू झाला आहे. परिसरातील सांडपाणी तलावात जाऊन सिद्धेश्वर तलाव प्रदूषित झाले आहे. काही दिवसांपूर्वीच अशाचप्रकारे माशांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पुन्हा एकदा हा प्रकार घडल्याने सिद्धेश्वर तलावातील जल प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

पाचपाखाडी येथे ठाणे महापालिकेचे मुख्यालय आहे. या मुख्यालयापासून काही मीटर अंतरावर असलेल्या सिद्धेश्वर तलावात शनिवारी रात्री मृत मासे



आढळून आले. यापूर्वी २४ एप्रिलला माशांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली होती. त्यानंतर ठाणे महापालिकेने येथील सांडपाणी रोखण्यासाठी उपाययोजना सुरु केल्याचा दावा केला होता; परंतु अवघ्या काही दिवसांतच पुन्हा एकदा मृत माशांचा खच तलावात आढळून आल्याने महापालिकेच्या कारभाराविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परिसरातील सांडपाणी थेट तलावात सोडले जात असल्याने हा तलाव प्रदूषित झाल्याचे समोर आले. याबाबत ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांना याबाबत विचारले असता, तलावात सोडले जाणाऱ्या सांडपाण्याचे सर्वेक्षण करण्यात आले असून ते सांडपाणी बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. परिसरात ४०० मीटरची मलनिस्सारण वाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. त्यासाठीचे सर्वेक्षण देखील झाले आहे. लवकरच या कामास सुरुवात होणार आहे. तसेच तलावातील प्रदूषण कमी करण्यासाठी या तलावात दोन वायुवीजन यंत्रणा आहेत. त्याठिकाणी आणखी चार वायुवीजन यंत्रणा बसविल्या जाणार असल्याचा दावा त्यांनी केला.

## मांस विक्री परवानासाठी ऑनलाईन अर्ज सुविधा

**नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय महापालिका कार्यक्षेत्रात खासगी कत्तलखाना उघडता येणार नाही. व्यवसाय परवाना बंधनकारक केले आहे. तरी सर्व मांस विक्री व्यावसायिकांनी या परवान्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www. nmmc.gov.in या वेबसाईटवर 'नागरिक सेवा' सेक्शनमध्ये आरोग्य विभागाच्या सेक्शनला भेट देऊन 'इमारत पूर्णत्व / भोगवटा प्रमाणपत्र' व आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच अनधिकृत मांस विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी व्यवसाय तात्काळ बंद करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# चाचणी शिबिरांसह एचएलएल आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिन साजरा

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम एचएलएल लाईफकेअर लिमिटेडने आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने २६ जिल्ह्यांमध्ये थॅलेसेमिया तपासणी आणि चाचणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. परवडणाऱ्या, उच्च दर्जाच्या प्रयोगशाळा निदान सेवा प्रदान करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या एचएलएलच्या निदान सेवा नेटवर्क हिंडलॅब्स येथे उच्च-कार्यक्षमता लिक्विड क्रोमॅटोग्राफी आणि हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसीससह प्रगत प्रयोगशाळा प्लॅटफॉर्मचा वापर करून ही चाचणी घेण्यात आली. याव्यतिरिक्त याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी एचएलएलने खारघर येथे थॅलेसेमिया जागरूकता परिषदेचे आयोजन केले होते. जनजागृती करण्यासह लवकर निदानाला प्रोत्साहन देणे, हे त्या दिवशी आयोजित मोहिमांचे उद्दिष्ट होते. स्क्रीनिंग, चाचणी आणि एचएलएलने संपूर्ण भारतात सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आपली वचनबद्धता दर्शविली. थॅलेसेमिया दिनाचा एक भाग म्हणून, महाराष्ट्रातील २०,००० हून अधिक व्यक्तींना एचपीएलसी आणि हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसिस सारख्या थॅलेसेमिया चाचणी सेवा प्रदान करण्यात आल्या.

### संतप्त नागरिकांकडून कचरा तातडीने उचलण्याची मागणी

# साईनाथ नगर येथील नालेसफाईच्या गाळाचा रस्त्यावरच ढीग

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

कळवा प्रभाग समिती अंतर्गत साईनाथ नगर येथे नाल्याची सफाई करण्यात आली. त्यानंतर मागील दहा दिवसांपासून या नाल्यातील गाळाचा भला मोठा ढीग तसाच नाल्याच्या बाजूला रस्त्यावर पडून आहे. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाने घाणेरडे पाणी पसरून परिसरात दुर्गंधी पसरली असून वाहनांच्या वर्दळीमुळे गाळ इतरत्र पसरत आहे. याचा त्रास नागरिकांना होत असून हा गाळ तातडीने उचलावा, अशी मागणी नागरिक करत आहेत.



नाल्यातील निघालेल्या गाळावर जंतुनाशक व दुर्गंधीनाशकाचे फवारणी करणे बंधनकारक असताना देखील अशी कुठल्याही प्रकारची फवारणी करण्यात आलेली नव्हती. तसेच नियमानुसार नाल्यातून काढलेला गाळ ४८ तास ठेऊन त्यानंतर तातडीने सक्षम अधिकाऱ्यांनी निर्देशित केलेल्या जागेवर विल्हेवाट न लावल्यास अशा चुकीच्या असमाधानकारक कामासाठी दंडात्मक कार्यवाहीची तरतूद असताना देखील संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत ठेकेदारास पाठीशी घालत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राहुल पिंगळे यांनी केला आहे. नालेसफाई दरम्यान पिण्याच्या पाण्याचे तोडलेले पाईप, काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांना हँन्ड ग्लोज, गमबुटसह इतर सुरक्षा उपकरणाचा अभाव या गोष्टीचे गांभीर्य कळवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून दिली. आलेले कर्मचारी आम्ही लगेच गाळ उचलून घेतो याव्यतिरिक्त नालेसफाई बाबतच्या कुठल्याही प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊ शकले नाहीत. त्यामुळे इथून पुढे प्रशासनाच्या माध्यमातून ठाणे शहरात नालेसफाई दरम्यान जर चुकीचे काम करत हातसफाई करण्याचा प्रयत्न झाला तर आंदोलनात्मक भूमिका घेतली जाईल असा इशारा राहुल पिंगळे यांनी दिला आहे. यावेळी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नालेसफाईच्या कामातील जबाबदाऱ्या घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांनाच माहित नसतील तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. आम्ही लवकरच याबाबत आयुक्तांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# आरोटे–डुंबरे पाटील कुटुंबीयांचा पर्यावरणपूरक लग्न सोहळा

### झेंडू बीजयुक्त लग्नपत्रिका, तुळशीच्या बीजांच्या अक्षता

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

येथील रहिवासी भाग्यश्री आरोटे आणि डुंबरे पाटील यांचे चिरंजीव सुशांत यांच्या विवाह समारंभात, सुशील आरोटे यांच्या पर्यावरणपूरक आणि सर्जनशील संकल्पनेतून एक आगळीवेगळी, निसर्गप्रेमाचा संदेश देणारी संपूर्ण संकल्पना साकारण्यात आली. या समारंभासाठी झेंडूच्या बीजांनी युक्त लाकडामुक्त कागदावर तयार केलेली खास लग्नपत्रिका पाहुण्यांना वितरित करण्यात आली. ही पत्रिका फेकण्याऐवजी कुंडीत लावता येईल आणि त्यातून झेंडूचे फूलझाड उगवेल, असा सकारात्मक आणि कृतीशील संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यात आला. अक्षता देखील पारंपरिक पद्धतीऐवजी तुळशीच्या



बीजांनी समृद्ध असलेल्या 'सिड पेपर'मध्ये पॅक करण्यात आली होती. ही अक्षता मातीमध्ये पेरल्यास तुळशीचे रोप उगवते. 'फेकू नका, लावा' आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' हेच या संकल्पनेमागील मुख्य ध्येय. विवाह समारंभात आलेल्या सर्व पाहुण्यांना परतफेडीच्या भेटवस्तू म्हणून २४ तास ऑक्सिजन निर्माण करणारे आणि पर्यावरण शुद्ध करणारे "स्नेक प्लांट" रोपे वितरित करण्यात आली. प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करण्यात आला आणि 'प्रकृतीविना जीवन अशक्य आहे' हा संदेश समाजासमोर प्रभावीपणे मांडण्यात आला. प्रत्येकाने एक झाड लावावे, त्याचे संगोपन करावे आणि हरितक्रांतीत आपला मोलाचा वाटा द्यावा, हीच आरोटे आणि डुंबरे कुटुंबाची पवित्र भावना आहे. ही संपूर्ण संकल्पना – सजीव पत्रिका, सिड पेपर अक्षता, रोपांचे वाटप-महाराष्ट्रभर एक दीपस्तंभ ठरेल आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देईल, असा ठाम विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला.

# जित्याची खोड...

आम्ही शांततेत राहावे म्हणून युद्ध करतो असे प्रख्यात ग्रीक तत्वज्ञ अरिस्टॉटल याचे वचन आहे. त्याची प्रचिती मोदी यांनी काही दिवसांपासून सुरू असलेल्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात आणून दिली. मोदी यांचा युद्धाचा आडाखा अचूक होता. भारताने पाकच्या नागरिकांवर हल्ले केले नाहीत. पाकच्या मांडीवर बसून भारतातील निरपराध नागरिकांना कंठस्नान घालणाऱ्या दहशतवाद्यांना टार्गेट केले. हे युद्ध होते आणि पाकचा या युद्धात सर्वंकष पराभव झाला, तसा तो पूर्वीही साडेतीन वेळा झाला आहे. पण आता तर तो जास्तच परिणामकारक आणि प्रिसिजन म्हणजे अचूक हल्ला होता असे म्हणावे लागेल. मोदी यांचे अचूक अंदाज आणि आडाखे किती अचूक आहेत याचा अंदाज येतो. वास्तविक हे युद्ध पारंपरिक अर्थाने नव्हते, तर हा पाकच्या नापाक इराद्यांना जमीनदोस्त करण्याच्या इराद्याने भारताने पाकला शिकवलेला धडा होता. पहलगाम येथे पाकच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर नृशंस हल्ले केले आणि त्यांचे कपडे काढून त्यांना ठार मारले. अनेकांना कलमा पढायला लावला आणि ज्यांना तो येत नव्हता त्यांना पॉइंट ब्लॅक गोळ्या घातल्या. या दहशतवाद्यांना मोदी यांनी धडा शिकवण्याचा निर्धार केला आणि तो अमलातही आणला. या जागी नेहरू किंवा काँग्रेसचे सरकार असते तर मुळमुळीत निषेधाचे खलिते धाडत बसले असते. पण मोदी आणि नेहरू किंवा काँग्रेस यांच्यात हा गुणात्मक फरक आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार आपल्याला नेमके काय हवे आहे हे निश्चित जाणते आणि तसेच करते. त्यामुळे मोदींची लोकप्रियता पराकोटीची वाढली आहे. पण येथे मोदी यांच्या लोकप्रियतेचा प्रश्नच नव्हता. ज्या भारताच्या निरपराध भगिनींनी आपले कुंकू गमावले त्यांच्या पतींच्या हत्येचा बदला घेणे आवश्यक होते आणि तेच मोदी यांनी केले. त्यामुळे या कारवाईला मोदी यांनीच 'ऑपरेशन सिंदूर' हे सार्थ नाव दिले. भारताला आता विरोधक शहाणपणा शिकवत आहेत की, भारताने युद्ध का केले नाही आणि पाकला संपूर्ण उद्ध्वस्त करायला हवे होते. जर तसे केले तर हेच विरोधक बोंबलत गेले असते की मोदी सरकारने पाकच्या लोकांना ठार मारले म्हणून. त्यामुळे मोदी यांनी शांत राहून आपला बदला घेतला आणि महिलांना न्यायही दिला आहे. पाकच्या कोणत्याही भुलावणीस बळी पडू नये हे जाणून मोदी यांनी पाकला आता त्यांच्या दहशतवाद्यांच्या अड्यांना उद्ध्वस्त केले आहे. जर लोकांना मारले असते तर पाक गाऱ्हाणी घेऊन बोंबलत गेला असता. पण आता त्याला ती संधी नाही. कारण भारतीय लष्कराने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले करून ते बेचिराख केले आहेत. यातच मसूद अझर याच्या कुटुंबीयांचा खात्मा झाला आहे. हा मसूद अझर म्हणजे तोच की ज्याने कंदाहार येथे विमान अपहरण प्रकरणात भारतीयांना ओलिस ठेवले होते आणि त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला होता. त्याचे नऊ कुटुंबीय ठार झालेत, तर दुसरा एक दहशतवादी अब्दुल रऊफ हा देखील या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ठार झाला आहे. हे युद्ध नव्हते तर पाकला त्याच्या जबरदस्त आगळीकीबद्दल तितकीच न भूतो न भविष्यती अशी शिक्षा होती. दहशतवादी आता हा धडा धेऊन चुकले असतील. आता भारतात काँग्रेसचे सरकार नाही, तर मोदी यांच्या भाजपाचे राज्य आहे आणि ते आपल्याला थोड्याही चुकीचे प्रायश्चित्त देते. पाकच्या शस्त्रसंधीवर भारताचा विश्वास नाही. त्यामुळे आता भारताने पाकला ठणकावून सांगितले आहे की यापुढे जर पाकने कोणतीही आगळीक केली, तर ते भारताविरोधात युद्ध पुकारले असा त्याचा अर्थ धेतला जाईल. यामुळे पाक आधीच गर्भगळीत झाला आहे. मोदी यांनी सिंधू जल करार स्थगित राहील अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे पाकच्या नाकातोंडात पाणी गेले आहे आणि त्यामुळे त्यांची शेती पाण्याअभावी सुकणार आहे. तसेच कित्येक आर्थिक उपाय योजले आहेत ज्यामुळे पाकचे जिणे मुश्किल होणार आहे. पाकला शिकवला तो धडा पुरेसा नसला तरीही सध्या तरी इतके पाकला आपल्या चुकीची जाणीव करून देणे आवश्यक होते आणि ती मोदी यांनी करून दिली आहे. भारताने या ऑपरेशनमध्ये दहशतवादी तळांवर हल्ले करून ते उद्ध्वस्त केले. हे यश फार मोठे आहे. भारताने कुठेही जनतेला ढाल केले नाही. त्याउलट पाकने त्याच्या स्वभावानुसार आपल्याच जनतेला ढाल करून भारतीय लष्करांवर हल्ले केले होते. पण ते हल्ले सर्व फोल ठरले. आता पाकला असा धडा शिकवला आहे की काही वर्षे तरी तो यातून डोके वर काढू शकणार नाही. पाकच्या कारवाया बंद तर होतीलच पण दहशतवादी ज्यांनी पहलगाम हत्याकांड घडवले त्यांना वेचून ठार मारण्यावर आता भारत लक्ष केंद्रित करेल. कारण भारताची ही जखम आहे की, जे दहशतवादी या हल्ल्याला जबाबदार आहेत ते तर पळून गेले आहेत. त्यांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत भारताचा बदला अपुरा राहील. आता पाकला शांततेची शिकवण याद येते आहे. पाकचे दैनीक 'द डॉन'मध्ये उपदेशाचे डोस पाजले आहेत की युद्ध कसे चुकीचे आहे. पण अगोदर कुणी सुरुवात केली आणि इतके दिवस पाक तेच करत होता. आता भारताकडून जशास-तसे किंबहुना त्यापेक्षाही कडवे उत्तर मिळायला लागले म्हणून पाकला आता शांतता आठवते आहे. शांतता हवी असेल तर ताकदवान असावे लागते. दुर्बळांच्या आवाहनाला कुणीही प्रतिसाद देत नाही. भारताने हे सिद्ध केले आहे. पाकने मात्र आपण अद्यापही सुधारत नाही असे वारंवार सिद्ध केले आहे. त्याने शस्त्रसंधी झाल्यावरही आगळीक सुरूच ठेवली आहे. पाकचे ड्रोन भारतीय हद्दीत येत आहे आणि त्यामुळे कित्येक घरांचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी माणसेही ठार झाली आहेत. पाकला कोणत्याही परिस्थितीत सामंजस्याचे बोलणे समजत नाही. त्याला बरबादीची भाषाच समजते. तसे असेल तर भारतही त्यास आता तसेच उत्तर देईल. मोदी यांनी पाकला धडा तर शिकवला आहे पण पाक ते समजणार नसेल तर पाकशी सर्वंकष हल्ल्याची भाषा करावी लागेल. अजूनही पाकच्या कुरापती काढण्याचे उद्योग सुरूच आहेत. त्या थांबल्या नाहीत, तर भारताला अखेरचा घाव घालावा लागेल. मग पाकला जगातील कोणताही देश वाचवू शकणार नाही हे सत्य आहे.

# पालिका निवडणुकांचे शिवधनुष्य दोन्ही ठाकरेंसाठी अवघडच...!

महाराष्ट्रनामा

महाराष्ट्रातील गेले तीन वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महापालिका नगर परिषदा, जिल्हा परिषदा तसेच पंचायत समितीच्या निवडणुका या आगामी चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्यातील ज्या महापालिका आणि नगर परिषदांची मुदत यापूर्वीच संपलेली आहे आणि जेथे प्रशासकीय राजवट आहे अशा सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी चार महिन्यांत घेण्याचे आणि निवडणुकांची अधिसूचना आगामी महिनाभरात काढण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबर २०२२ पूर्वी ओबीसीचे आरक्षण जे त्यापूर्वी अस्तित्वात होते त्याच ओबीसींच्या आरक्षणानुसार या वेळच्या निवडणुका घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि विशेषतः मोठ्या महापालिका नगर परिषदा जिल्हा परिषदा यांच्या निवडणुकांचा मार्ग अखेरीस मोकळा झाला आहे. त्यामुळे राजकीय पक्षांमध्ये पालिका निवडणुकांच्या तयारीच्या आनुषंगाने पडद्याआडून आणि पडद्यावर देखील मोठ्या प्रमाणावर हालचाली होऊ लागल्या आहेत.

राज्याच्या दृष्टीने मुंबई महापालिका ही सर्वात मोठी आणि श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. साहजिकच मुंबई महापालिकेच्या सत्तेच्या माध्यमातून मुंबईवर आपले वर्चस्व दाखवण्याची संधी भाजपा यंदा साधल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही अशीच चिन्हे आहेत. यापूर्वी २०१७ मध्ये मुंबई महापालिकेच्या निवडणुका झाल्या होत्या आणि त्यावेळी भाजपा आणि एक संघ शिवसेना यांची युती राज्यात सत्तेवर होती. मात्र तरी देखील मुंबई महापालिकेच्या निवडणुका या भाजपा आणि शिवसेनेने स्वतंत्र लढल्या होत्या त्यामध्ये सत्ताधारी शिवसेनेला ८४, तर भारतीय जनता पक्षाला अवघ्या दोन जागा कमी म्हणजेच ८२ जागा मुंबईत स्वबळावर जिंकता आल्या होत्या. राज्यातील सत्तेत त्यावेळी असलेले शिवसेनेचे महत्त्व लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मैत्रीला जागत मुंबई महापालिकेची सत्ता ही उद्धव ठाकरे यांच्यासाठी एकसंघ शिवसेनेला बहाल केली होती. हे सांगण्याचे प्रयोजन म्हणजे २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदासाठी जे काही केले आणि अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या प्राप्तीनंतर आज शिवसेनेची जी काही वाताहात झाली आहे ती जर लक्षात घेतली, तर एकट्या उद्धव ठाकरे यांच्यासाठी मुंबई, ठाणे, नाशिक अथवा संभाजीनगर अशा कोणत्याही मोठ्या महापालिका जिंकणे हे आता जवळपास अशक्य म्हणजेच दुरापास्त झाले आहे. भाजपाने एकीकडे स्वतःची राजकीय रेषा मोठी करतानाच दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांची राजकीय रेषा कशी कापली जाईल याचीही पुरेपूर व्यवस्था करून ठेवली आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, नाशिक, संभाजीनगर, कल्याण, डोंबिवली अथवा नवी मुंबई अशा कोणत्याही महापालिकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची लढत ही प्रामुख्याने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेबरोबर अथवा भारतीय जनता पक्षाबरोबर होणार आहे आणि जर आताचे



राजकीय चित्र लक्षात घेतले, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे असतील अथवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील यांच्यामुळे शिवसेना आणि भाजपा यांच्या मातब्बर उमेदवारांसमोर हतबल असलेले उद्धव ठाकरे यांचे उमेदवार किती आणि कसा तग धरतील याबाबत राजकीय वर्तुळात शंकाच आहेत.

**एकनाथ शिंदेंचे प्रबळ आव्हान...!**

या पालिका निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्यासमोर एकीकडे भाजपासारखा बलाढ्य राष्ट्रीय पक्ष, तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून शिवसेनेतूनच फुटून उभी ठाकलेली दुसरी प्रती शिवसेना, अशा दोन मातब्बर विरोधकांशी एकाचवेळी उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारांना लढावे लागणार आहे. भाजपा उमेदवारांच्या पाठीशी केंद्रीय तसेच राज्यातील सत्तेचे पाठबळ असल्यामुळे भाजपा उमेदवार हे उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारांना सहजरीत्या चारही मुंड्या चित करू शकतील असे राजकीय चित्र आहे. त्याचबरोबर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्यानंतर उद्धव ठाकरे यांना मुंबई महापालिकेतून ऑल आऊट करणे हे एकनाथ शिंदे यांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. एका प्रकारे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोघांचेही राजकीय अस्तित्व हे मुंबई महापालिकेवर अवलंबून आहे. एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिकेवर गेल्या दोन वर्षांपासून आपले लक्ष केंद्रित केले असून महापालिका निवडणुका जिंकण्यामध्ये हातखंडा असलेले एकनाथ शिंदे हे मुंबईतही बाजी मारतील का हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. तसे तर एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे मुंबईतील ५०, ५५ हून अधिक नगरसेवक स्वतःकडे वळवण्यात यश मिळवले आहे. मुंबईतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे पदाधिकारीदेखील मोठ्या संख्येने एकनाथ शिंदे यांनी स्वतःकडे घेतले आहेत. त्यामुळे शिंदे यांच्या वाढत्या राजकीय वर्चस्वापुढे उद्धव ठाकरे कितपत टिकाव धरू शकतील हे देखील एक प्रश्नचिन्हच आहे. उद्धव ठाकरेंचे लहान-मोठे एकेक शिलेदार रोज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत डेरे दाखल होत आहेत. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये मुठभर निष्ठावांतांच्या पाठबळावर उद्धव ठाकरे हे एकनाथ शिंदेंचा उधळलेला हा चौखूर यशाचा घोडा रोखणे हे उद्धव ठाकरे यांच्यासाठी मोठे डोकेदुखी ठरली आहे.

**उद्धव-राज एकत्र येऊनही फारसा उपयोग नाही?**

भाजपा एकनाथ शिंदे यांचा मुंबई, ठाणे आणि नाशिक, नवी मुंबई, पालघर या जिल्ह्यांमधील महापालिकांमध्ये असलेला राज्यातील आणि केंद्राच्या सत्तेच्या माध्यमातून दबदबा लक्षात घेऊन भाजपा पेक्षाही एकनाथ शिंदे यांना रोखण्यासाठी उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्याशी संधान साधू शकतात. मात्र उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र आल्यानंतर देखील मुंबईत हे दोन्ही ठाकरे बंधू भाजपाच्या बलाढ्य ताकतीपुढे टिकाव धरण्याची शक्यता कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे हिंदुत्वाची ताकद ही २०१४ पासून भारतीय मतदार आणि महाराष्ट्रातील शहरी मतदारही प्रादेशिक पक्षांना मतदान करणे ऐवजी भाजपासारख्या प्रबळ हिंदुत्ववादी राष्ट्रीय पक्षाला मतदान करणे हे आता अधिक श्रेयस्कर मानू लागला आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे भाजपाबरोबर असल्यामुळे भाजपाबरोबरचे फायदे हे शिंदे आणि अजित पवार यांना मिळत आहेत. तथापि उद्या जर शिंदे अथवा अजित पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणेच जर काही आगळीक केली, तर भाजपाच्या केंद्रीय तसेच राज्यातील सत्तेच्या माध्यमातून जे काही लाभ या दोघाही नेत्यांना आणि त्यांच्या पक्षांना मिळत आहेत ते आपसूकच बंद होतील याची जाणीव या दोघाही नेत्यांना आहे. त्यामुळेच थोड्याफार कुरबुरी या सर्वत्र असतात मात्र २०२९ पर्यंत केंद्रातील आणि राज्यातील भाजपा सरकार हे शक्तिशाली आणि स्थिर सरकार असल्यामुळे कुरबुरी किंवा नाराजी असली तरी देखील हे दोघेही नेते सत्ता सोडू शकत नाहीत याची जाणीव भाजपा नेत्यांना देखील आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे जरी पालिका निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आले तरीदेखील प्रत्यक्ष मतदानात दोन्ही ठाकरे बंधूंचा कितपत प्रभाव पडेल याबाबत साशंकता आहे. फार तर एकनाथ शिंदे यांची उमेदवार जिथे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षाच्या उमेदवारासमोर असतील तेथे मराठी मतदार कोणाचे नेतृत्व स्वीकारतात यावरून राज आणि उद्धव एकत्र आल्याचा परिणाम हा सकारात्मक आहे की नकारात्मक आहे याचाही निकाल लागू शकणार आहे. अर्थात यासाठी उद्धव ठाकरे यांना महाआघाडीची म्हणजेच विशेषतः काँग्रेसची साथ कितपत लाभते हेही पाहावे लागणार आहे. कारण लोकसभेला महाआघाडीने मुस्लीम आणि दलित मतांचे जे ध्रुवीकरण साध्य करण्यात यश मिळवले होते ते जर का पालिका निवडणुकीतही कायम राखायचे असेल, तर उद्धव ठाकरे यांना काँग्रेसची साथ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. एकूणच उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे यश हे पूर्वीसारखे त्यांच्या स्वतःच्या पाठबळावर निश्चित होणार नसून महाआघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी तसेच मनसे यांच्या भूमिका या नेमक्या काय असणार आहेत यावरच बरेच काही अवलंबून आहे.

**- सुनील जावडेकर**

# मेट्रो मार्ग-३ मुंबईचा सुसाट प्रवास...!

मुंबई डॉट कॉम

मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यासाठी मेट्रो मार्ग क्रमांक तीन म्हणजेच एक्वा लाईनच्या व कुलाबा सीप्झ मार्गिकेवरील भूमिगत मेट्रोवरील एक मार्गीका नुकतीच सुरू करण्यात आली आणि मुंबईकरांचा प्रवास आणखी सुखकर झाला. कुलाब्यातील कफ परेड ते सिप्झजवळील आरे जेवीएलआर स्थानक या दरम्यान संपूर्णपणे भूमिगत असणारी मेट्रो मुंबई शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी एक महत्त्वाचा प्रकल्प ठरली आहे, तर हा महत्त्वाचा प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर या मार्गावरून दररोज सुमारे १३ लाख प्रवासी प्रवास करतील असा अंदाज आहे. कुलाबा ते सिप्झ दरम्यान धावणाऱ्या मेट्रो मार्ग क्रमांक तीनची लांबी ३६.५ किमी असून ही मार्गीका पूर्णपणे भूमिगत मार्गीका आहे. यावर २७ स्थानके असून २६ स्थानके भूमिगत असून एक जमिनीवर आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च ३७ हजार २७६ कोटी अंदाजे आला आहे. या मार्गिकेवरील गाडी ताशी ८५ किलोमीटर वेगाने धावते तर स्थानकांवर थांबण्यासह याचा प्रभावी सरासरी वेग हा ३४ किलोमीटर प्रतितास एवढा आहे. या मार्गिकेवर एकूण सरकत्या जिन्यांची संख्या ४२० असून एकूण १८५ उदवाहक लिफ्ट बसवण्यात आलेल्या आहेत. या मार्गिकेवरील एकूण आतापर्यंत ९४.८% काम पूर्ण झाले असून ९९.८३% स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत तर शंभर टक्के टर्निंगचे काम पूर्ण झाले असून ट्रॅकची शंभर टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. यातील टप्पा एक हा जे. व्ही. एल. आर. सीप्झ ते बीकेसी हा ७ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्यान्वित करण्यात आला. यात दहा स्थानके असून याचे अंतर १२.६९ किलोमीटर होते. या मार्गीकेवरील तिकिटांचे दर १० रुपये कमीतकमी असून जास्तीतजास्त पन्नास रुपये आहे.

सध्या यावर एकूण प्रवासी संख्या ही ४१ लाख ६६ हजार ३६३ जणांनी आतापर्यंत प्रवास केला असून दररोज सरासरी २० ते ३० हजार प्रवासी प्रवास करत आहेत. यातील पहिल्या टप्प्यातील गाड्यांची संख्या १० असून बीकेसी ते आरे दरम्यान केवळ २२ मिनिटात प्रवास पूर्ण करता येतो तर दिवसभर २६० फेऱ्या पूर्ण होतात. आता कालपासून सुरू झालेल्या बीकेसी ते आचार्य अत्रे चौक यातील स्थानकांची संख्या सहा असून अंतर ९.७७ किलोमीटर आहे. तिकिटाचे दर हे कमीतकमी दहा रुपये असून कमाल भाडे ४० रुपये आहे. यातील गाड्यांची संख्या ८ असून प्रवास वेळ हा बीकेसी



ते आचार्य अत्रै चौक हा १५ ते २० मिनिटं लागणार आहे. यातील फेऱ्यांची संख्या २४४ होणार असून आरे ते आचार्य चौक आता ३६ मिनिटात पार करता येणार आहे. तिकीट दर हा आरे सीप्झ ते आचार्य अत्रे चौक दरम्यान कमल ६० रुपये असणार आहे. आरे ते आचार्य अत्रेच्या दरम्यान रेल्वे स्थानकातील सरकतील जिन्याची संख्या २०८ होणार असून एकूण ६७ उदवाहक लिफ्ट असतील. ही रेल्वे सेवा सुरू झाल्यामुळे वांद्रे, कुर्ला संकुल, वरळी यासारख्या व्यापारी आस्थापने जोडले जाणार असून बीकेसी स्थानक मेट्रो मार्ग दोन डी आणि बुलेट ट्रेनशी देखील भविष्यात जोडले जाणार आहेत. त्यामुळे प्रवासी संख्येत वाढ होणार आहे .

सिद्धिविनायक मंदिर, माहीम दर्गा, माहीम चर्च यासारखी धार्मिक स्थळे तसेच शिवाजी पार्क, रवींद्र नाट्यमंदिर, शिवाजी मंदिर, यशवंतराव नाट्यमंदिर, प्लाझा सिनेमा यासारखी मनोरंजनाची ठिकाणे या मार्गाने जोडली जाणार आहेत. आता थोड्याच दिवसात आचार्य अत्रे चौक ते कफ परेड हा आणखी एका टप्पा सुरू होणार आहे. याचे अंतर ११ किलोमीटर असून या मार्गावर ११ स्थानके असतील आणि तीही सर्व भुयारी स्थानके असतील. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पूर्णपणे कफ परेड ते आरे सिप्झ जाण्यासाठी एक तासापेक्षा कमी कालावधी लागणार आहे. यामुळे एकूण सहा प्रमुख रोजगार व व्यावसायिक केंद्रांशी कनेक्टिव्हिटी जोडली जाईल. नरिमन पॉईंट, कफ परेड, फोर्ट, लोअर परेल, वांद्रे कुर्ला संकुल व सिप्झ एमआयडीसी एकमेकांशी जोडले जातील. जवळपास ३०हून अधिक शैक्षणिक संस्था, १३ रुग्णालय, १४ धार्मिक स्थळे व ३० हून अधिक मनोरंजन स्थळे आता जोडली जातील. उपनगरिय रेल्वेने जोडली न गेलेले गिरगाव, काळबादेवी, वरळी व आंतरराष्ट्रीय विमानतळ व आंतरदेशीय विमानतळ या एका मेट्रो सेवेने जोडले जातील.

या संपूर्ण मेट्रो मार्गावरील प्रवाशांचा भार हा मुंबई उपनगरिय सेवा मोनोमार्ग व बस मार्गावरील पंधरा टक्के प्रवासी याचा वापर करतील अशी अपेक्षा असून त्यामुळे मुंबई उपनगरीय रस्ते मार्गावरील भाग कमी करण्यास मदत करेल अशी अपेक्षा आहे. या मेट्रो मार्गावरील गाड्या या मानवरहित गाड्या आहेत, मात्र सध्या ही मानवरहित यंत्रणा चालकासह कार्यान्वित केलेली आहे. मात्र कालांतराने या मार्गांवरील गाड्या या चालकविरहित धावतील. ही मेट्रो मार्गीका कार्यान्वित झाल्यास पर्यावरणीय फायदेही बरेच होणार असून ६.६५ लाख वाहने रस्त्यावरील कमी होतील अशी अपेक्षा आहे. दिवसाला ३.५४ लाख लिटर इंधन मागणी कमी होईल. तथापि रस्त्यावरील वाहतूक ३५ टक्क्यांनी कमी होईल. ध्वनी प्रदूषणालाही आळा बसेल. या रेल्वे डब्यांमध्ये संपूर्ण वातानुकूलित यंत्रणा असून प्रवाशांना आरामदायक प्रवास होईल याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात आलेले आहे.

माहिती व जाहिरातीसाठी प्रत्येक डब्यात एलसीडी स्क्रीन बसवण्यात आलेल्या आहेत. सुलभ प्रवासी घोषणा सिस्टीम प्रत्येक डब्यात आहेत. दिव्यांग प्रवाशांसाठी व्हीलचेयर ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल. दृष्टिहीन प्रवाशांसाठी रंगीत ग्रीप हिल्स बसवण्यात आले आहेत. ही मुंबई मेट्रो जरी भूमिगत रेल्वे असली तरी सुरक्षिततेच्यादृष्ट्या पूर्णपणे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून सुसज्ज अशी ही मेट्रो रेल्वे असून जपान तसेच इतर प्रगतिशील देशांनी या मेट्रोसाठी तांत्रिक व आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे इथून प्रवास करताना आपण भारतात आहोत की परदेशात असाच प्रश्न पडतो. ही मेट्रो मार्गीका कार्यान्वित झाल्यास रेल्वेवरील भार व रस्त्यावरील भार नक्कीच कमी होईल यात कोणतीच शंका नाही! असो...पण नुकतेच दोन टप्पे सुरू झाले आहेत. सध्या गर्दी कमी असेल तेव्हा एकदा तरी हा प्रवास करून पाहावाच असा आहे.

**- अल्पेश म्हात्रे**

## राशिभविष्य

सोमवार, १२ मे २०२५

**॥ पंचांग ॥**

आज मिती वैशाख पौर्णिमा शके १९४७ चंद्र नक्षत्र स्वाती. योग व्यतिपात, चंद्र राशी तूळ,भारतीय सौर २२ वैशाख शके १९४७ म्हणजेच सोमवार, दि. १२ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ७.०५ मुंबईचा सूर्यास्त ७.०४, मुंबईचा चंद्रोदय ६.०३, मुंबईचा चंद्रास्त ५.२९. उद्याचा राहू काळ ७.४२ ते ९.२०. वैशाखपौर्णिमा, कूर्म जयंती, पुष्टिपती विनायक जयंती, बुद्ध पौर्णिमा, वैशाख स्नान समाप्ती, पौर्णिमा समाप्ती-रात्री-१०.२५, पारशी दये मासारंभ.

**॥ भविष्य ॥**

**मेष** : शांततेने निर्णय घ्यावे लागतील.

**वृषभ** : सरकारी कामात यश मिळेल.

**मिथुन** : जवळचे प्रवास घडतील.

**कर्क** : भाग्याची साथ मिळेल.

**सिंह** : व्यवसाय-धंद्यात प्रगती होऊन उलाढाल वाढेल.

**कन्या** : वादविवाद टाळा.

**तूळ** : आर्थिक चिंता सुटतील.

**वृश्चिक** : सकारात्मक विचारांच्या व्यक्तींच्या सहवासात राहा.

**धनू** : जुने मित्रमंडळी भेटतील.

**मकर** : तरुण-तरुणींचे प्रश्न सुटल्यामुळे आनंदी राहाल.

**कुंभ** : नवीन बदल घडवून आणू शकाल.

**मीन** : प्रेमात यश लाभेल.

## जनसंवाद

### अतिरंजित बातम्यांचे फुटलेले पेव

भारत-पाक युद्धाच्या अतिरंजित बातम्यांचे फुटलेले पेव जनतेत संभ्रम निर्माण करणारे आहे. ब्रेकिंग न्यूजच्या हव्यासापायी या वृत्तवाहिन्या सत्यतेची पडताळणी न करताच सनसनाटी बातम्या देऊन मोकळ्या होताते. युद्धाच्या गंभीर परिस्थितीचे भान न ठेवण्याचा उतावीळपणा वास्तवतेचा अतिरेक करूं शकतो याचा साधा विचार देखील त्यांच्या मनात येत नाही याचे आश्चर्य वाटते. भारताच्या युद्धसज्जतेचा इत्यंभूत तपशील देणे किती धोकादायक आहे ही साधी गोष्ट त्यांना कळू नये याचा खेद वाटतो. हिंसक कृत्ये जशीच्यातशी प्रसारित करताना जणू त्यांची संवेदनशीलता लुप्त झालेली असते. चुकीच्या बातमीमुळे साऱ्या भारतीयांची दिशाभूल होऊ शकते हे न समजण्याइतके ते दूधखुळे होऊ पहात असतील तर सरकारने त्यांच्यावर त्वरीत बंधने आणावीत आणि युद्धाच्या अनिर्बंध बातम्यांवर यथायोग्य चाप लावावा जेणेकरून वस्तुस्थितीचा विपर्यास होणे बंद होईल.

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर.

### वृत्तवाहिन्यांकडून तारतम्याची अपेक्षा

"युद्धस्य कथा रम्या" म्हणजे युद्धाच्या कथा ऐकायला रंजक वाटू शकतात, पण प्रत्यक्षात त्या युद्धाचा अनुभव भोगणाऱ्यांसाठी त्यात काहीही रम्य नसते. भारत-पाकिस्तान दरम्यान निर्माण झालेल्या युद्धसदृश्य परिस्थितीचं वार्तांकन करताना अनेक भारतीय वृत्तवाहिन्यांनी हेच भान गमावले. जुन्या युद्धाच्या चित्रफिती थेट प्रसारण म्हणून दाखवणे, भारतीय सैन्य पाकिस्तानात घुसून महत्त्वाची शहरे ताब्यात घेत असल्याच्या ब्रेकिंग न्यूज खोट्याच नव्हे, तर अतिशयोक्त बातम्यांच्या नावाखाली कल्पनारंजन सुरू केलं. २६/११ च्या हल्ल्यावेळी लष्करी कारवाईचं थेट प्रक्षेपण करून दहशतवाद्यांना माहिती पुरवणाऱ्या चुकांची आठवणही यावेळी कुणाला झाली नाही. संरक्षण मंत्रालयाने वेळीच हस्तक्षेप करून थोडाफार आळा घातला, पण तोपर्यंत जनमानसावर खोट्या विजयाची छाप पडली होती. जणू आपण काश्मीरसह पाकिस्तानही जिंकलोच आहोत, अशी भावना निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर सह्याद्री वाहिनीवरील संयमित, तथ्याधारित आणि शांत शैलीत दिलेल्या बातम्यांनी विश्वासार्हतेचा आदर्श निर्माण केला. ही वृत्तवाहिनी इतरांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. लोकशाहीत माध्यमांना मोकळेपणा असावा, पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही हवी. युद्धासारख्या वार्तांकनात तथ्य, संयम यांचा समतोल हवा.

**-दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### माथेफिरू, विश्वासघातकी पाकिस्तान

पहलगाम येथील माथेफिरू पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या हल्ल्यात २६ निष्पाप भारतीयांचा मृत्यू झाल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून बदला घेऊन भारतीय संरक्षण दलांनी पाकिस्तानच्या दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केलेच पण अनेक दहशतवाद्यांना यमसदनाला पाठवून पाकिस्तानचे अक्षरशः कंबरडे मोडले. बिथरलेल्या पाकिस्तानने मग रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत भारताच्या जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरातच्या सीमावर्ती शहरांमध्ये ४०० ते ५०० निशस्त्र ड्रोन सोडून भारताच्या हल्ल्याला प्रतिकार केल्याची हवा निर्माण केली. अर्थात भारतीय सैन्य दलाच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतल्या हवेत हे ड्रोन निष्क्रिय केल्यामुळे पाकिस्तानच्या प्रतिहल्ल्याची हवा निघून गेली. अखेर चार दिवसांपासून सुरू असलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे बेजार झाल्यानंतर पाकिस्तानने माघार घेत अमेरिकेकडे 'युद्धविरामासाठी मध्यस्थी करावी' अशी याचना केली. भारतानेही ती मान्य केली. मात्र युद्ध विरामाची घोषणा झाल्यानंतरही पाकिस्तानने युद्धविरामाचे उल्लंघन केले आणि विश्वासघातकी असल्याचा प्रत्यय आणून दिला. अशा धर्मांध आणि दहशतवादी देशाकडून सामंजस्याची आणि मानवतेची अपेक्षा ठेवणे केव्हाही चुकीचे ठरेल.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### आजही हंडाभर पाण्यासाठी वणवण

पिण्याच्या पाण्यासाठी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लोकांना हंडे घेऊन दूरवर जावे लागत आहे. अहिल्यानगर, मेळघाट, उत्तर महाराष्ट्र, यवतमाळ आदी भागात विहिरीच्या पाण्याची पातळी खोल गेलेली वर्तमानपत्रातील छायाचित्रातून दिसत आहे. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली परंतु या भागात लोकांना पिण्याचे पाणी पुरेसे मिळू शकत नाही. उलट महाराष्ट्रातील भूजल पातळीमध्ये घसरण होत आहे. हे अनेक वर्ष चालू आहे. याला एक कारण म्हणजे पालक नेत्यांचे मतदारसंघात लक्ष नसणे. ज्या पाणी योजना कागदावर मंजूर होतात त्या कोट्यावधी रुपयांच्या असतात. त्यामध्ये हितसंबंध असतात. नोकरशाहीतील भ्रष्टाचारामुळे त्यांची योग्य अंमलबजावणी वेळेत होऊ शकत नाही.

**- गिरीश भागवत ,** यशवंतनगर

### देशद्रोह्यांना शोधण्याची मोहीम हाती घ्या

भारतातील स्वपंथीयांना डावलून पाकिस्तानी नागरिकांशी निकाह करणाऱ्या अशा महिलांचे आणि त्यांच्या मुलांचे इमान कोणाशी आहे वेगळे सांगायला नको. अशांना भारतात ठेवायचे की पाकिस्तानात पाठवायचे असा यक्षप्रश्न सुरक्षा यंत्रणांपुढेही निर्माण होतो. भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले ते सर्व पाकपुरस्कृत असले, तरी आतंकवादी कारवाई ही स्थानिकांच्या मदतीशिवाय होत नाही. आतंकवाद्यांना रसद पुरवणारे, स्थानिकच होते. आजमितीला घुसखोरी ही भारतासाठी मोठी समस्या आहे. बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांची संख्या आज कोटींच्या घरात गेली आहे. त्यांना शोधून त्यांच्या देशात पाठवणे सुरक्षा यंत्रणांसमोरील मोठे आव्हान आहे. कारण यातील बहुतांश लोकांकडे भारताची अधिकृत ओळखपत्रे आहेत. ही ओळखपत्रे त्यांना उपलब्ध करून देणारे देशद्रोही भारतातच राहतात. आज सैनिकी कारवाया थांबल्या आहेत, आता अंतर्गत सुरक्षा यंत्रणांनी कार्यान्वित होण्याची नितांत आवश्यकता आहे. येत्या काळात देशद्रोही मंडळींना शोधून त्यांच्यावर देशद्रोहांतर्गत कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घ्यायला हवी. आपल्या आजूबाजूला अशी मंडळी वावरत असल्यास त्याची खबर वेळीच द्या.

**- जगन घाणेकर,** घाटकोपर, मुंबई

### 'सिंदूर' ट्रेडमार्क वापरण्यास परवानगी देऊ नये

'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेअंतर्गत भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानला धडा शिकवला. भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी केले. भारतीय सैन्याच्या या शौर्याचे भांडवल करून काही निर्माते, उद्योजक यांनी 'ऑपरेशन सिंदूर' ट्रेडमार्कसाठी अर्ज केलेत. सीमेवर युद्धजन्य परिस्थिती असताना हे निर्माते, दिग्दर्शक स्वतःचा उद्योग व्यवसाय वाढवण्यासाठी 'ऑपरेशन सिंदूर'च्या ट्रेडमार्कचा वापर करण्याचा विचार करतात. याला निव्वळ स्वार्थ म्हणतात. या निर्माते, दिग्दर्शकांनी स्वतःची हिन मानसिकताच दाखवून दिली. अशाप्रकारे भारतीय सैन्याचा वापर करून स्वतःचा उद्योग, व्यवसाय वाढवणे योग्य नाही. 'ऑपरेशन सिंदूर' संबंधित चित्रपट, मालिकांच्या शीर्षकांच्या नोंदणीसाठी आलेले सर्व अर्ज निकालात काढून कोणालाही 'ऑपरेशन सिन्दुर'चा ट्रेडमार्क वापरण्यास परवानगी देऊ नये.

**-श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

## काव्यकोडी



**एकनाथ आव्हाड**

### बोलतंय कोण?

दोनदा वाजला
घरातला फोन
सारेच कामात
घेईल कोण?

मीच उचलला
फोन चटकन
म्हटलं, कोण?
बोला पटकन

बाबा आत्ता
नाही घरात
आई आहे
खूपच कामात

दादा करतोय
अभ्यास कधीचा
ताईने ओरडा
खाल्लाय आईचा

मलाही आहे
कामच काम
कामाने दमून
गेलोय जाम

झालं का बोलून
ठेवू का फोन?
पण नाव नाही सांगितलं
बोलतंय कोण?

*१) धान्याच्या कापणीसाठी
वापरले जाते
बागकाम करण्यासाठी
उपयोगात येते*

*लाकडी मूठ आणि
तोंड वळलेले असते
ओळखले का लोखंडी हे
साधन कोणते?*

*२) मेणापासून मुख्य
तिची निर्मिती होते
घरगुती उद्योगातही
ती तयार केली जाते*

*दंडगोलाकार आकार
वर छोटीशी वात
अंधारावर कोण बरं
करते मात ?*

*३) सतार, तंबोऱ्यासाठी
याचा होतो वापर
म्हातारी यात बसून
गेली दूरवर*

*वेलीवर येते
आकाराने मोठी
सांगा बरं ही
फळभाजी कोणती?*

उत्तर -
१) कुदळ
२) मेणबत्ती
३) भोपळा

eknathavhad23 @gmail.com

## चित्र रंगवा बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@prahaar.co.in


**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोकृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
**प्रचेत मंदार मुंज**
शाळा : ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, चारकोप

परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# विहिरीचे पाणी गरम का असते?



कथा
**प्रा. देवबा पाटील**

आनंदराव आजोबांसोबत स्वरूप दररोज सकाळी फिरायला जात होता. फिरताना तो आजोबांना खूप प्रश्न विचारायचा.

" आपण आज घरी गेल्यावर मस्तपैकी आपल्या घरच्या विहिरीच्या पाण्याने स्नान करू." आजोबा म्हणाले.

" नाही हो आजोबा, त्या थंडगार पाण्याने उलट जास्त थंडी वाजेल आपल्याला " स्वरूप म्हणाला.

"अरे बाळा, हिवाळ्यात आपल्या सभोवतीच्या वातावरणाचे तापमान हे खूप कमी असते; परंतु जमीन थंड व्हायला वेळ लागत असल्याने जमिनीखालील खोलवर भागाचे तापमान जास्त असते. त्यामुळे जमिनीखालील बंदिस्त पाण्याचे तापमान सुद्धा बाहेरच्या हवेच्या तापमानापेक्षा जास्त असते म्हणून हिवाळ्यात विहिरीचे किंवा कूपनलिकेचे पाणी गरम असते. उलट उन्हाळ्यात जमिनीवरच्या हवेचे तापमान हे जमिनीखालील तापमानापेक्षा जास्त



असल्याने उन्हाळ्यात विहीर किंवा कूपनलिकेतून काढलेले पाणी बाहेरच्या पाण्यापेक्षा थंड वाटते." आजोबांनी सांगितले.

" मग करायचं का विहिरीच्या पाण्याने स्नान? स्नानानंतर झकास तेल लावू आपण आपल्या अंगाला." आनंदरावांनी स्वरूपला विचारले.

" आजोबा आंघोळीनंतर तेल कशासाठी लावायचे हो अंगाला? सगळ अंग चिकट होईल तेलाने." स्वरूप म्हणाला.

आनंदराव म्हणाले, "आपल्या शरीरावरील त्वचेखाली तैलग्रंथी व घर्मग्रंथी असतात. त्यांच्यामधून स्त्रवलेले तेल व घामाच्या मिश्रणाने एक पातळ थर आपल्या कातडीवर पसरतो. हा थर आपल्या कातडीखालील आर्द्रता म्हणजे ओलावा टिकवून ठेवतो व आपली त्वचा मऊ राहते. हिवाळ्यात आपण आंघोळीसाठी गरम पाणी वापरतो त्यामुळे त्वचेखालील तेलाचे सूक्ष्म बाष्पीभवनाने प्रमाण कमी होते. तसेच हिवाळ्यात हवा कोरडी व थंड असते. या कोरड्या हवेने कातडीवरील तेल व घाम बाष्पीभूत झाल्याने त्वचेखालील आर्द्रतेचे सुद्धा बाष्पीभवन होते. त्यामुळे त्वचेखालील ओलावा कमी होऊन आपली त्वचा कोरडी पडते व उलते, ओठ फुटतात, हात उलतात, पायाला भेगा पडतात. म्हणूनच हिवाळ्यात स्नानानंतर स्वच्छ रुमालाने त्वचा कोरडी करून अंगाला किंचितसे तेल लावतात. हिवाळ्याच्या दिवसांत आंघोळीआधी असे तेल लावून जर उन्हात बसले, तर आपली त्वचा सूर्यकिरणातील ऊर्जा शोषून घेते व त्या सूर्यकिरणांची आपल्या रक्तातील विशिष्ट घटकांवर प्रक्रिया होऊन आपल्या शरीरात भरपूर 'ड' जीवनसत्त्व तयार होते."

असे गप्पा गोष्टी करीत करीत दोघेही नाताजले घरी आले. घरी आल्याबरोबर स्वरूप त्याच्या आईला म्हणाला, "आई, आता मी दररोज आजोबांसोबत विहिरीच्याच कोमट पाण्याने आंघोळ करेन"

आईने हसत हसत त्याला " हो बाळा, करीत जा" असे म्हटले आणि दोघांचे स्नानाचे कपडे आणायला घरात गेली.

इकडे आजोबांनी विहिरीवरील मोटारपंप सुरू करून दिला. आईने कपडे आणून दिल्यानंतर आई पुन्हा घरात निघून गेली व या दोघां नाताजल्यांनी मोटरपंपच्या पाईपच्या पाण्याच्या कोमट धारेखाली आपली आंघोळ सुरू केली.

# ओळख!



कथा
**रमेश तांबे**

एक होती मांजर
काळ्या करड्या रंगाची
मजबूत अंगकाठी अन्
घाऱ्याघाऱ्या डोळ्यांची
गावभर फिरायची
म्याव म्याव करायची
मांजर सगळ्यांची आवडती होती
तिला कोणाची नव्हती भीती
कोणाच्याही घरात शिरे
दूध पी कधी खा खीर
कधी बाजारात जाऊन
यायची मासे खाऊन
शाळेतल्या पोरांकडून
अंग घ्यायची खाजवून
तर कुणा काकूच्या मांडीवर
राहायची तासभर बसून
सगळं कसं मजेत सुरू होतं
तरी पण तिला त्यात सुख नव्हतं

तिला वाटायचं त्या कुत्र्याचं किती बरं
त्याचा भू-भू आवाज किती दमदार
आवाजात त्यांच्या किती दम
सारी मुलं घाबरतात जाम
माझा आवाज कुत्र्यासारखा असता
तर मलाही सारे घाबरले असते
रुबाबात फिरली असते सगळीकडे
माझाही दरारा राहिला असता चोहीकडे
अन् काय आश्चर्य झालं
मांजरीच्या घशात काहीतरी घुसलं
मांजरीला आला खोकला
आवाज तिचा बदलला
म्याव म्याव आवाज येईना
काय झाले तिला कळेना
मग ती जोर लावून
ओरडली
भू-भू असं म्हणाली
मांजरीला आला आवाज
कुत्र्याचा
गायब झाला आवाज
मांजरीचा
मग काय मांजर खूश
झाली
बारक्या पोरांना घाबरवू लागली
ती लागली भू-भू करू
सगळेच लागले पळू
मांजरीला खूप आनंद झाला
माझा आवाज बदलला
मग ती खुशीतच घराच शिरली
काकूच्या मांडीवर जाऊन बसली
बसली तर बसली भू-भू ओरडली
तशी काकूने तिला
लांब फेकली
हात पाय मोडले
नाहीत
कशीबशी वाचली
स्वयंपाक घरात
तिला कोणी
घेईना
दूध खीर खायला
मिळेना
अंग खाजवायला कोणी
येईना
जवळ तिला कोणी घेईना
मांजरीला कळेना
कुत्रासुद्धा भू-भू करतो
पण त्याला कोणी मारत नाही
मलाच असे का वागवतात
प्रत्येक वेळी मला दूर सारतात

मग तिला आठवले
आपण आहोत मांजर
आपला आवाज आपलं
दिसणं
लोकांनी
स्वीकारलंय
आपण जसे आहोत
तसेच
लोकांना आवडतोय
दुसऱ्यासारखं वागणं बरं नव्हं
आपण आपल्या जागी
दुसरा दुसऱ्याच्या जागी
हत्तीला वाघाचा आवाज
चालणार नाही
आणि सशाला सिंहाची
आयाळ शोभणार नाही
प्रत्येकाची वैशिष्ट्य आहेत
प्रत्येकजण वेगळा आहे
अन् तरीही तो चांगला आहे
उगाच दुसऱ्यासारखं बनण्याचा
प्रयत्न करू नये
जे मिळाले त्यात समाधान मानावं.

या प्रसंगातून मांजरीला
एक धडा मिळाला
ज्यातून तिला आनंदाचा
नवा मार्ग सापडला!



# सुवर्णपदक



प्रतिभारंग
**प्रा. प्रतिभा सराफ**

१९१२ सालच्या ऑलिम्पिकमध्ये ओक्लाहोमाच्या भारतीय, अमेरिकन जिमने धावण्याच्या शर्यतीत अमेरिकेचे प्रतिनिधित्व केले होते, असा उल्लेख करून खाली एक फोटो दिला होता त्या फोटोत त्या व्यक्तीने दोन्ही पायांत वेगवेगळ्या आकाराचे रंगाचे बूट घातलेले होते. गंमत म्हणजे एका बुटामध्ये चार-पाच मोजे घातल्यासारखे वाटत होते, तर दुसऱ्या बुटात एकच मोजा होता.

हा फोटो पाहताना गंमत वाटली आणि त्याच्याविषयी अधिक माहिती मिळवताना कळले की हा व्यक्ती म्हणजे 'जिम थोर्प.' तर धावण्याची शर्यत सुरू होण्याआधी त्याचे बूट चोरीला गेले अशा वेळेस तो अनेक कारणे देऊन स्पर्धेपासून दूर राहू शकला असता. त्याने या स्पर्धेत भाग घेऊ नये यासाठीच तर कोणीतरी बूट चोरण्याचा प्रपंच केला होता. जिमने थोडी शोधाशोध केली त्याला त्याचे बूट काही सापडू शकले नाहीत; परंतु त्याला एका कचऱ्याच्या बादलीत दोन वेगवेगळ्या आकाराचे, रंगाचे कोणीतरी फेकून दिलेले बूट सापडले. एक त्याच्या पायाच्या मापाचा असावा, तर दुसरा पायापेक्षा मोठा असावा आणि म्हणूनच त्याने धावताना मोठा असणारा बूट पडू नये म्हणून त्याखाली जास्त मोजे घातले. तो धावला. पायातली बूट विसरून त्याने आपले लक्ष काय आहे याचा फक्त विचार केला आणि आत्मविश्वासाने धावला त्याचा फायदा असा झाला की, त्या दिवशी त्याला धावण्याच्या स्पर्धांमध्ये दोन सुवर्णपदकं प्राप्त झाली.

आता आपण आपला स्वतःचा विचार करूया. जेव्हा आपल्या आयुष्यात कठीण प्रसंग निर्माण होतात तेव्हा आपल्याला त्याला कसे तोंड द्यायचे हे लक्षात येत नाही, आपली चिडचिड होते, आपले काहीतरी चुकते, आपण निराश होतो, दुःखी होतो आणि त्या अस्वस्थ मानसिक अवस्थेतच राहिल्यामुळे आपण काहीच करत नाही आणि स्वाभाविकपणे आपल्या पदरी अपयश पडते!

सर्वात सोपे उदाहरण घेऊया. आपण रोजच दिवसातून चार वेळा काहीतरी खातो. आपण जे खातो तेच आपण असतो, असे म्हटले जाते. त्यामुळे उगाचच्या उगाच आपण याला त्याला दोष देणे बरोबर नाही. काय, किती आणि केव्हा खायचे हे आपण ठरवले, तर आपले वजन आटोक्यात येते. अनेक आजारांवर आपण मात करू शकतो; परंतु हे एक-दोन दिवस करून चालत नाही, तर सातत्याने अनेक दिवस, अनेक महिने, अनेक वर्षे आपल्याला करावे लागते.

इतकी साधी गोष्ट लक्षात घेऊन आपण पुढचा विचार करूया-

आपण जेव्हा दुसऱ्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटना पाहून त्यांनी त्यावर कशाप्रकारे मात केली हे परत परत पाहत राहतो, ऐकत राहतो. सातत्याने चांगल्या गोष्टी आपल्या कानावर पडत राहिल्या की त्याचप्रमाणे आपले विचारही त्याचप्रमाणे प्रगल्भ होतात. अशा वेळेस अचानक जेव्हा एखाद्या प्रसंगाला आपल्याला तोंड देण्याची पाळी येते तेव्हा आपले विचार आपल्याला सकारात्मकतेकडे घेऊन जातात. आपण पर्याय शोधू लागतो आणि एखादा पर्याय त्या कठीण प्रसंगातून मार्ग काढायला उपयोगी पडतो. असे एकदा घडले की आयुष्यात कोणताही कठीण प्रसंग आला की आपण अधिक आत्मविश्वासाने दुसऱ्याही प्रसंगाला तोंड देण्यासाठी पर्याय शोधू लागतो.

'जिम'ला जसे सुवर्णपदक मिळाले तसे कदाचित आपल्याला भव्य-दिव्य यश मिळू शकत नाही; परंतु वेळ निभावून नक्कीच नेऊ शकतो!

म्हणूनच म्हटले जाते सुवर्णपदकही सोन्याची बनलेली नसतात ती आपल्या कष्टाची, जिद्दीची, प्रयत्नांची, अभ्यासूवृत्तीची, सकारात्मक विचारांची आणि इतरांपेक्षा दोन पावलं अधिक विश्वासाने पुढे टाकल्याची बनलेली असतात.

त्यामुळे कोणत्याही प्रसंगात खचून न जाता, आत्महत्येचा विचार न करता केवळ कसे जगता येईल, याचा जरी विचार केला तरी ती गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण प्रत्येक माणसाचे आयुष्य कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक मौल्यवान असते!

pratibha.saraph@ gmail.com

# स्वावलंबनात यशाचा मार्ग





लहानशा गोष्टी, मोठा अर्थ
**शिल्पा अष्टमकर**

**जो दुसऱ्यावर विसंबला |
त्याचा कार्यभाग बुडाला |
जो आपणचि कष्टत गेला |
तोचि भला ||**

आपल्या जीवनात एक अनुभव अनेकदा आला असेल. एखाद्या पुस्तकासाठी अथवा नोट्ससाठी तुम्ही मित्रावर विसंबून राहिलात आणि ऐन परीक्षेच्या वेळी मित्राने तुमचा घोटाळा केला. शाळेच्या गणवेशाला इस्त्री करण्यासाठी तुम्ही बहिणीवर विसंबून राहिलात आणि ऐन प्रजासत्ताक दिनी तुमची ताई कुठेतरी सहलीला निघून गेली. महात्मा गांधींचा स्वावलंबन तत्त्वावर फार भर होता. माणसाने स्वतःची कामे स्वतःच करण्याची सवय करून घेतली पाहिजे. 'आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही' अशी मराठीत म्हण आहे... प्रत्येक गोष्टीत कुणावर तरी अवलंबून राहायचे आणि अपयश आले म्हणजे कुणावर तरी दोषारोप करायचा हा मानवी स्वभाव आहे; परंतु हा काही मोठा सद्गुण नाही. अशा स्वभावामुळे आपण आपले नुकसान तरी करून घेतो किंवा पराधीन तरी होतो.

एकदा छत्रपती शिवाजी महाराजांना पन्हाळगडावर हल्ला करायचा होता. सायंकाळी एका विशिष्ट वेळी ७००० फौज घेऊन महाराजांनी पन्हाळगडाच्या पायथ्याशी पोहोचायचे आणि त्याचवेळी नेताजी पालकर यांनी ५००० फौज घेऊन पन्हाळगडाच्या पायथ्याला यायचे असे ठरले होते; परंतु नेताजी पालकरांनी यायला खूप उशीर केला. महाराजांनी थोडा वेळ वाट पाहून पन्हाळगडावर हल्ला चढवला. पन्हाळगडावर आदिलशाची अफाट फौज होती. महाराजांचे सैन्यबळ कमी होते. परिणामतः पराभव पत्करून त्यांना विशालगडावर पळून जावे लागले. नेताजीवर अवलंबून राहिल्यामुळे महाराजांसारख्या पराक्रमी पुरुषाला पराभव पत्करावा लागला. दुसऱ्या दिवशी नेताजी फौज घेऊन विशाळगडावर महाराजांना भेटायला आला. पण महाराजांनी त्याला सरनौबत पदावरून काढून टाकले. रुसलेला नेताजी पालकर प्रथम आदिलशहाला आणि नंतर मोगलांना जाऊन मिळाला. त्या निर्माण झालेल्या कटूतेमुळे महाराजांना एक सच्चा मित्र गमवावा लागला.

म्हणून आपली दिनचर्या निश्चित करावी. दिवसभरात जी कामे करायची त्यासाठी कुणावर विसंबून न राहता त्याचे नियोजन नीट करावे. म्हणजे कुणाला दोष देण्याचा प्रश्न उपस्थित होणार नाही. आपल्या इंद्रियांना कामाचे वळण असले पाहिजे व जीवनाला एक शिस्त असली पाहिजे. ज्या गोष्टी आपल्याला झेपणार नाहीत किंवा आपल्या क्षमतेच्या बाहेर आहेत, त्या गोष्टींचा नाद सोडून द्यावा.

स्वतःचे दप्तर स्वतः भरणे, दर रविवारी आपले कपाट आवरून ठेवणे, स्वतःच्या बुटांना स्वतःच पॉलिश करणे, आपले वेळापत्रक भरणे अशी किरकोळ कामे आपली आपण करावीत त्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाला संपन्न आकार प्राप्त होईल स्वावलंबन म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वावर, मेहनतीवर आणि क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवून स्वतःचे जीवन घडविणे.

इतरांवर अवलंबून न राहता स्वतःच्या मार्गाने यश मिळवण्याची ही प्रक्रिया असते. स्वावलंबन ही कुठल्याही यशस्वी जीवनाची खरी सुरुवात आहे.

स्वावलंबी माणूस स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवतो. तो अपयशाने खचत नाही, उलट तो ती त्यासाठी शिकण्याची संधी मानतो. जगातील अनेक यशस्वी व्यक्ती- स्वामी विवेकानंद, अब्दुल कलाम यांनी स्वावलंबनाच्या जोरावरच यशाच्या शिखरांवर झेप घेतली.

आजच्या काळात जेवढी स्पर्धा वाढते आहे, तेवढेच स्वावलंबनाचे महत्त्वही वाढते आहे. पूर्वीच्या काळात बहुतेक लोक नशिबावर किंवा दुसऱ्याच्या मदतीवर अधिक भर देत असत. पण आता जग खूप बदलले आहे. आजच्या तरुणांनी जर स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला, तर कोणत्याही क्षेत्रात ते यशस्वी होऊ शकतात. स्वावलंबी व्यक्तीची मानसिकता ही सकारात्मक, प्रयत्नशील आणि धाडसी असते. ती अपयशाने खचून जात नाही. उलट प्रत्येक अडचण ही एक संधी म्हणून स्वीकारून, ती आपले ध्येय गाठण्यासाठी झटत राहते. स्वावलंबनामुळे माणसामध्ये आत्मविश्वास वाढतो. कोणत्याही संकटासमोर तो डगमगत नाही.

उदाहरणार्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन पाहा. त्यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेतले, संघर्ष केला आणि शेवटी भारताच्या संविधानाचे शिल्पकार झाले. त्यांनी कोणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या कर्तृत्वाने आपली ओळख निर्माण केली. हेच खरे स्वावलंबन! आज सरकारही 'स्टार्टअप इंडिया', 'आत्मनिर्भर भारत', 'मुद्रा योजना' यांसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून तरुणांना स्वयंरोजगारासाठी मदत करत आहे. यातून हेच दिसून येते की, आज समाजाला गरज आहे अशा व्यक्तींची जी स्वतःच्या हिमतीवर उभे राहतील आणि इतरांनाही रोजगार देतील. स्वावलंबन म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर मानसिक आणि बौद्धिक स्वातंत्र्यही होय. विद्यार्थी वर्गाने केवळ अभ्यासात नव्हे, तर निर्णय घेण्यात, विचार करण्याच्या पद्धतीतही स्वावलंबी होणे गरजेचे आहे. स्वतः अभ्यास करून, विचार करून निर्णय घेणारा विद्यार्थीच पुढे जाऊन मोठे यश मिळवतो. समाज, राष्ट्र किंवा संपूर्ण मानवजातीचा विकासही फक्त स्वावलंबनातूनच शक्य आहे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वतःला जबाबदार मानून काम करतो, तेव्हाच खरी प्रगती होते. निष्कर्षतः, स्वावलंबन हा यशाचा खरा मार्ग आहे. जो स्वतःवर विश्वास ठेवतो, कठोर परिश्रम करतो आणि अपयशांना न घाबरता पुढे जात राहतो, तोच खऱ्या अर्थाने यशस्वी होतो. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्या जीवनात स्वावलंबन स्वीकारले पाहिजे.

# माजलगाव पालिकेत मोठे रॅकेट!

## बोंबला | बनावट पीटीआर,बोगस गुंटेवारी, नाहारकत

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव: येथील नगर परिषद गेल्या ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीत प्रशासक राज असल्याने मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण हे पालिकेत फिरकतच नसल्याने तेथील कारभार करणाऱ्या पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी. बनावट कामे करण्याचा सपाटा लावला असतांनाच काल बोगस दानपत्रा आधारे पिटिआर दिल्याच्या गंभीर प्रकरण उघड झाल्याने संबंधित दलाल व पालिकेच्या ४जबाबदार कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्याने . वरचेवर अनेक प्रकरण उघडतेस येऊ लागले. त्यातच बोगस गुंटेवारी , घरकुलासाठी बोगस पीटीआर गेल्याचा प्रकार समोर आल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

माजलगाव न.प. ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणून पाहिले जात असतांना याचा गैरफायदा घेण्यासाठी पालिकेतील विविध विभागाचे प्रमुख माहिर असतांनाच बाहेरील दलाला मार्फत आर्थिक फायद्या पोटी बनावट पीटीआर, बनावट गुंठेवारी प्रमाण




संबंधित विभागातील गैर बाबींची चौकशी करुन काही गैर आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल.
चंद्रकांत चव्हाण,मुख्याधिकारी न.प. माजलगाव

पत्र,व नाहारकत दिले जात आसल्याचे गैरप्रकार उघड होतांना दिसत आहेत.मात्र न.प.कार्यालया कडे नेहमी कानात डोळा करत असलेले मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण या गैरप्रकाराबाबत दुर्लक्ष का करत आहेत याचा शोध लागलेला नाही. माजलगाव शहरात भुअभिन्यासास झालेल्या ठिकाणी शहर विकासासाठी सोडण्यात आलेल्या सार्वजनिक भूखंड (ओपनस्पेस) अनेक भुखंड बनावट भुअभिन्यासाद्वारे मूळ मालकांनी हडप केलेले आहे. करोड रुपयाच्या जागा केवळ पालिकेतील मुख्याधिकारी व संबंधित कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगणमत करून सदरील ओपन स्पेस च्या जागा हडप केल्या गेल्या आहेत. संबंधित मूळ मालक हे धन दांडगे असल्याने सामान्य माणसांनी तक्रार देण्यास धजावत नाहीत ज्यांनी कुणी तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता त्याला धमकावण्या चे काम केले जात असल्याने या लोकांचे फावले होत आहे.सन.२०२०पुर्वी खरेदी खत आसलेल्या जागेच्या च्या गुंठेवारी करता येतात मात्र सन २०२० नंतर बोगस गुंठेवारी सर्व नंबर ७मध्ये बाजार समितीचे बागवान बंधुंना विक्री केलेल्या जमिनीमध्ये बोगस गुंठेवारी केल्याची माहिती समजली या गंभीर बाबी कडे मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष आर्थिक तडतोडची माहिती समजली या सह शहरातील अनेक भागात अशाच प्रकारच्या गुंठेवारी झाल्या आहेत. व या सह सदरील गुंठेवारी ची रक्कम न.प.च्या खात्यात जमा होत नसल्याची गंभीर बाब उघड झालेली आहे.

### लक्ष देण्याची गरज...

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रशिक्षणार्थ कालावधीमध्ये माजलगाव न.प.चे सन २०१९मध्ये मुख्याधिकारी म्हणून दोन महिने काम पाहिले. या दरम्यान त्यांनी माजलगाव नगरपरिषदेचा बहुतांशी अभ्यास केलेला आहे. त्या दरम्यान नगरपरिषद मध्ये जाणवलेली अपरातफर, प्रकरणी तात्कालीन तिन मुख्याधिकारी ,अनेक लेखापाल यांच्या संबंधीत पदाधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल केले होते तीच परिस्थिती सध्या माजलगाव नगर परिषदे मध्ये सुरु असलेल्या गैर कारभाराकडे स्वतः जिल्हाधिकारी असताना त्यांनी लक्ष द्यावे अशी माजलगाव शहर वासीयांची त्यांच्याकडून अपेक्षा आहे.

### बुक अजून जमा नाही?

एका वसुली कर्मचारी यांच्या कडुन २०२२पासुन १००पावत्याचे २१क्रमांकाचे बुक अद्याप नगर पालिका कार्यालयात जमा केले नसतांना मुख्याधिकारी महाशय यांनी त्या कर्मचाऱ्यांस पुन्हा नविन बुक दिल्याची माहिती आहे. २१ क्रमांकाच्या बुकातील फाडलेल्या पावत्याची रक्कम लाखो रुपयांच्या घरात गेली असताना सदरील रक्कम न.प.खात्यात जमा नसल्याचे पालिकेतील जबाबदार कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले आहे. तरी ही त्या कर्मचाऱ्यावर पालिकेतील मोठी जबाबदारी देऊन मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण कोणते हित साध्य करत आहेत याचा बोध होत नाही.

# परळीत श्रामनेर शिबिराचा समारोप

## भदंत पय्यातीस महाथेरो:पंचशीलाचे आचरण महत्वाचे

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:जगाला शांतीचा व समतेचा संदेश देणाऱ्या तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ जयंतीनिमित्त जवळा फकीर येथे भव्य धम्म रॅली व दहा दिवसीय श्रावणी शिबिराचा समारोप करण्यात आला. दैनंदिन जीवनात पंचशीलाचे आचरण अतिशय महत्त्वाचे असल्याचे यावेळी भदंत पय्यातीस महाथेरो यांनी धम्मदेसना देतांना सांगितले .

मृगदायवन महाविहार धम्म प्रशिक्षण संस्था सारनाथ पार्क, जवळा फकीर येथे २ मे पासून दहा दिवसीय श्रामनेर शिबिर भदंत पय्यातीस महाथेरो यांच्या



मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबिराचा समारोप १२ मे बुद्ध जयंती निमित्त करण्यात आला. त्यापूर्वी भीमनगर येथून सकाळी भव्य अशी बुद्धमूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शेकडो बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमास राजेंद्रजी कांबळे, बाळासाहेब वाघमारे व पिराजी कांबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. धम्म रॅली मृगदायवन महाविहारात आल्यानंतर भदंत पय्यातीस महाथेरो यांची पान २ वर

# लक्ष विचलित करून वृद्ध सोन्याची अंगठी लांबवली

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:रस्त्याने चालत असताना एका वृद्ध नागरिकाचे लक्ष विचलित करून अज्ञात चोरट्यानी त्यांच्या बोटातील सोन्याची अंगठी लांबविल्याची घटना आज सकाळी भरदिवसा कड्यात घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की कडा येथील नगर– बीड रोडवरील जुन्या पोस्ट कार्यालयाच्या परिसरात बसस्थानकाच्या दिशेने चाललेल्या बशीर रसूल सय्यद (रा. पिंपळा ता. आष्टी) या पंचांहत्तर वर्षीय वृद्धाला थांबवून रस्त्याने बोलत बोलत त्यांचे लक्ष विचलित करून अज्ञात चोरट्याने त्यांच्या बोटातील एक तोळ्याची सोन्याची अंगठी काढून भरदिवसा लांबविली. सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली आहे. सध्या कडा येथे मौलाली बाबांचा यात्रा उत्सव चालू असल्यामुळे शहरांमध्ये दर्शनाला येणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी वाढली आहे. याच गर्दीचा चोरटे फायदा घेताना दिसत आहेत. त्यामुळे नागरिकांनी दर्शनाला जाताना मोबाईल, पैसे व किमती वस्तूची काळजी घेण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# माजलगावमध्ये बुद्ध पौर्णिमा उत्साहात!

## नियोजन:भारतीय बौद्ध महासभेकडून बुद्ध जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:भारतीय बौद्ध महासभा तालुका याजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९व्या जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली त्या अनुशंगाने दि १ मे २०२५ ते ५ मे २०२५ या कालावधीत त्रिसरण बुद्ध विहार चिंचगव्हाण येथे महिला उपासिका शिबीर संपन्न झाले,४ मे २०२५रोजी बुद्ध विहार संम्राट अशोक नगर येते अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर संपन्न झाले आणी दि ३ मे२०२५ पासुन चालु झालेले पुज्य भन्ते दिपरत्न यांच्या नेतृत्वात सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचा समारोप दि १२मे २०२५ वार सोमवार वैशाख पौर्णिमा या



दिवशी सकाळी ८.वा डॉ आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार आसी तथागत भगवान बुद्धाच्या मुर्ती ठेउन भिख्खू संघासमवेत भव्य धम्मरॅली काढण्यात आली या रॅलीत तालुक्यातील धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या नंतर सांची बुद्ध विहार येते पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद.बी बी धन्वे सर यांच्या हस्ते करण्यात आले या नंतर संघ भोजन होऊंन पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर पान २ वर

# वंचितची मुंबई प्रदेश कार्यकारिणी

## निवड:अहिरे अध्यक्षपदी तर सोहनी महिला अध्यक्ष




पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर:वंचित बहुजन आघाडीची मुंबई प्रदेश कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे. मुंबई प्रदेश अध्यक्षपदी चेतन अहिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर स्नेहल सोहनी यांची मुंबई प्रदेश महिला आघाडीपदी निवड करण्यात आली आहे. यासोबतच संपूर्ण मुंबई प्रदेश कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली आहे. पान २ वर

# अंजुम उल उलूम शाळेचा निकाल

## शैक्षणिक:सेमी इंग्रजीचे २१ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल घोषित करण्यात आला. या वर्षी अंजूमन शिक्षण संस्था आझाद नगर परळी वै द्वारा संचलित अंजूम उल उलूम कन्या माध्यमिक शाळेचा निकाल १००% लागला असून यामध्ये विशेष प्राविण्यासह ३८ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाले. तसेच प्रथम श्रेणीतून ४५ विद्यार्थींनी उत्तीर्ण झाले शाळेतून एकूण ९९ विद्यार्थींनी परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले होते त्या पैकी सर्व ९९ विद्यार्थींनी उत्तीर्ण झालेले आहेत. शाळेतून शेख लजीना फातेमा समीर ९१.६० गुण घेऊन प्रथम तर कच्छी सायमा आफताब ९१.२०



द्वितीय आणि

शेख जुनेराफातेमा मोईन ९०.६० गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकाविला आहे. याव्यतिरिक्त

सय्यद मरजीया फातेमा वजाहत अली ८९.८०, खान नाजमीन सज्ञाद ८९.६०,सय्यद गाजीयाअदीन सबाहत अली ८९,शेख मसिरा फातेमा अब्दुल इर्शाद ८८.८०, शेख आयेशा जावेद ८८.४०, कुरेशी मारीया वसिम ८७.६०, खान आयमन इम्रान ८६.४०, सिद्दीकी हाजरा मोहम्मद जमीरोद्दीन ८६.२०, शेख फातेमा समद ८६.२०, शेख सना ताहेर ८६, कुरेशी मुस्कान निसार ८५.८०, बागवान खनसा रशिद ८५.४०, शेख अर्शिया तौपिक ८५.०० गुण घेऊन उत्तीर्ण झाले पान २ वर

# मॅट्रीकच्या परीक्षेत मिळविले यश

## अभिनंदनिय:देविका जाधवला पडले ९२ टक्के



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल जाहीर केला आहे. मंगळवारी १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. राज्यात दहावीचा निकाल दुपारी १ वाजता लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. पाटोद्यातील देविका जाधव हिने दहावीच्या परिक्षेत कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

पाटोद्यातील देविका जाधव हिला दहावीत ९२ टक्के गुण मिळाले आहेत. देविका ने दहावीच्या परिक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्यामुळे प्रियदर्शनी विद्यालयात देविकाचे कौतुक होत आहे. पान २ वर

# पुण्यात 'सीली स्लीप गॅलरी'

## कार्यक्रम:लक्झरी मॅट्रेसच्या नवीन श्रेणीचे उदघाटन



पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:जगप्रसिद्ध मॅट्रेस ब्रँड सीली इंडियाने पुण्यात 'सीली स्लीप गॅलरी' चे भव्य उद्घाटन केले. अजमेरा व्हेंचर्स यांच्या मार्फत सुरु करण्यात आलेली ही गॅलरी आयसीसी टेक पार्क (प्लॉट ), जे.डब्लू मॅरिअट शेजारी, ग्राउंड फ्लोअर येथे स्थित आहे. सुमारे १३०० चौरस फूट जागेवर उभारलेली ही गॅलरी पुण्यातील लक्झरी स्लीप अनुभवाची नवीन ओळख निर्माण करणार आहे.

गॅलरीचे उद्घाटन सीलीचे चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जॉर्ज डायर, जनरल मॅनेजर श्री. जी. एस. एस जगन्नाथ, आर्किटेक्ट श्री. अजिंक्य धुमाळ आणि फ्रँचाईजी मालक श्री. राजकुमार व श्री. पदमकुमार कुमार अजमेरा यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटनप्रसंगी श्री. जॉर्ज डायर म्हणाले, राजकुमार आणि पदमकुमार अजमेरा हे सिली ब्रँडचे जुने आणि विश्वासू भागीदार आहेत. त्यांचे कौशल्य आणि निष्ठा यामुळे ही गॅलरी ग्राहकांना चांगली पान २ वर

## ऋणानुबंध | १९८९ च्या बॅचचे गेट टुगेदर

# वर्गमित्रांची पून्हा भरली शाळा

पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी: लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालय राहुरीच्या १९८९ च्या बॅचचे गेट टुगेदर कार्यक्रम शुभ कीर्ती रिसॉर्ट राहुरी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला या बॅचने सन २०१८मध्ये प्रथम गेट–टुगेदर द्वारे कार्यक्रमाचे आयोजन केले होते या ग्रुपने गेले अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपयोग उपक्रम राबवून आपले सामाजिक दायित्व दाखवले आहे

शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप शाळेला रोख स्वरूपात मदत गरजू विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिनाचे निमित्ताने खाऊ वाटप तसेच कोल्हापूर सांगली येथील पूरग्रस्तांना मदत तसेच राहुरी तालुक्यातील दोन ठिकाणी जळीत कुटुंबाला आर्थिक मदतीचा आधार या ग्रुपच्या वतीने देण्यात आला आहेआयोजित केलेल्या



गेट–टुगेदर मध्ये या बॅचच्या विद्यार्थ्यांनी एक नवीन संकल्प केला आहे की या पुढील काळातही आपण समाज उपयोगी व चांगले काम करू मैत्रीचे नाते आयुष्यभर जपून एकमेका साहाय्य करू असे ठरवून गोर गरीब वंचितांना मदतीचा हात देण्याचे ठरविले आहे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक राजू नरोडे हे होते कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मच्छिंद्र गुलदगड राहू काका तनपुरे यूसुफभाई देशमुख संजय इघे राजू पवार दिलीप गागरे सर्जेराव लाटे शिवाजीराव खामकर यांनी विशेष परिसर घेतलेया प्रसंगी राजेंद्र नरोडे पोपट आघाव सतीश सप्रे शशिकांत शेळके शोभा साळवे कैलास ठोकळे चंद्रकांत आघाव इनामदार श्रीकांत निशिगंध संगीता शेळके संजीवनी जावरे अर्चना मानकर द्वारका साळवे जया पवार आशा शिंदे शोभा साळवे नंदा पेरणे शारदा गाडे वसंती

# अंजुमन,महबूबिया शिक्षण संस्थेत आता इंग्रजीचे धडे

## बहादूरभाई: पालकांना प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:अंजुमन शिक्षण संस्था,परळी द्वारा संचलित अंजुम उल उलूम कन्या शाळा आणि महबूबिया शिक्षण संस्था द्वारा संचलित इमदादुल उलूम शाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु झाल्यानंतर चालू शैक्षणिक वर्षापासून उर्दू माध्यमातून सेमी–इंग्रजी उइडए पॅटर्न सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.यासोबतच या दोन्ही शाळांमध्ये ड्घऋआणि णघऋचे वर्ग देखील प्रथमच सुरू होणार आहेत.

अंजुम उल उलूम कन्या शाळेत गतवर्षी पासुन तर इमदादुल उलूम शाळेत दोन वर्षापासुन सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु आहेत.आता उइडए मध्ये हे वर्ग सुरू करण्यात येत आहेत.



स्थानिक विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक पद्धतीचा लाभ घेता यावा यासाठी उर्दू माध्यमातून उइडए पॅटर्नद्वारे दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यात पान २ वर